# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०१**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक २ / जानेवारी २००६

## संपादकीय

## अनावश्यक माहितीचे ताण आणि मध्यमवर्गीय माणूस ?

तंत्रज्ञानामुळे जसे ताणतणाव वाढत आहेत तसेच माहितीच्या माऱ्यामुळेही ते प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. इतक्या असंख्य प्रकारची बरोबर वा चुकीची माहिती हजारो माध्यमांतून आपल्यापर्यंत येत असते की सांगायची सोय नाही. उलटसुलट माहितीमुळे आपला अर्जुनच होतो.

परवा एका नियतकालिकात 'अंडे खाणे म्हणजे विष खाण्यासमान आहे' या आशयाचा लेख वाचला. शास्त्रीय दृष्ट्या (लेखकाचा!) हा मुद्दा त्याने पटवून दिला होता. पण 'त्याविरुद्ध अंडे चांगले' असते असे सांगणारे लेखही आपल्यापर्यंत पोचत असतात. एखाद्या रोगावरील वृत्तपत्रातील लेख वाचला की आपली पहिली प्रतिक्रिया काय असते ? ही लक्षणे आपल्यात आढळतात का हे तपासणे थोडेही लक्षण साम्य आढळले की आपण विलक्षण अस्वस्थ होतो. लगेच डॉक्टर गाठा, टेस्ट करा ... जणू काही असे नाही केले तर आपले कठीणच आहे !

काही तज्ज्ञ (या मंडळींना काय म्हणावे हेच मला कळत नाही ) 'टी. व्ही. वरील व्यायामप्रकार पहात तुम्हीही अनुकरणातून व्यायाम करु शकता' असे सांगतात तर या उलट 'गुरुच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम करा' असे सांगणारेही तज्ज्ञ आहेत. जाहिराती, चित्रपट, वृत्तपत्रे, ग्रंथ, सीडी, कॅसेट ... किती प्रकारची माध्यमे आहेत आणि किती प्रकारची माहिती सतत चिखल फेकावा तशी फेकत असतात !

सचिनचे पहिले शतक कधी, कोणाविरुद्ध कोठे ... संपूर्ण तक्ता. क्रिकेटच्या आकडेवारीचं विश्व समजावून घेताघेता मीनाकुमारी, धर्मेन्द्र यांच्या चित्रपटांची यादी समोर येते. ती उलटली तर राजकीय नेत्यांच्या जीवनक्रमाचे आलेख येतात ... **या सर्व माहितीची, ही वाचण्याची गरज असते का ? न समजावून घेता आपण वाचतो आणि अनावश्यक माहितीचा ताण मनावर कार्यरत होतो**, डोळ्यांवर येत रहातो. हे माहीत नसेल तर आपलं निभावणार नाही असं आपल्याला वाटत रहातं 'वेल इनफरमड्' असणं ही काळाची गरज असते, जी. के. वाढवायला हवं 'याची जाणीव कुरतडत असते.

(पृष्ठ क्र. ४०वर)




वर्ष सातवे / अंक २ / जानेवारी २००६

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक ७ वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ ११९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लेखन प्रवास विंदांचा | प्रा. ज्योतिका ओझरकर | ३ |
| २) | श्री राघवेन्द्र स्वामी महाराज जीवन व कार्य प्रकरण १,२ | शं. बा. मठ | ६ |
| ३) | वाहता वाहता वाहे... अेक सत्य कथा | अरुण श्री. ठाकूर | १२ |
| ४) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | १७ |
| ५) | परिसरातील झाडे -अशोक | डॉ. मोझेस कोलेट | २५ |
| ६) | अक्षौहिणी म्हणजे किती | माजी विद्यार्थी | २७ |
| ७) | चित्रकला : दृष्टीकोन | सौ. मंजिरी दांडेकर | २८ |
| ८) | वर्ल्ड फोरम ऑन अर्ली चाईल्ड हूड केअर अँड एज्युकेशन - कॅनडा एक वृत्तान्त | सौ. विशाखा देशपांडे | ३० |
| ९) | पुरस्काराची जबाबदारी | श्री. मिलिंद बल्लाळ | ३३ |
| १०) | परिसर | संकलित | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# लेखनप्रवास विंदांचा

*विंदांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आणि मराठी भाषेचा गौरव झाला या पार्श्वभूमीवर* ***विंदांच्या साहित्याच्या अभ्यासिका प्रा. ज्योतिका ओझरकर यांचा हा लेख*** *! सदर लेख पुर्नमुद्रित असून त्यांच्या परवानगीने व. पॉप्युलर प्रकाशनच्या सौजन्याने दिशात देत आहोत. - संपादक*

विंदा करंदीकर हे मराठी नवकवितेच्या नव्या पिढीतील एक श्रेष्ठ कवी आहेत. १९३७ ते १९८५ या कालखंडात त्यांनी आपला लेखनप्रवास केला आहे. करंदीकरांची नवकविता प्रगल्भ, गंभीर, व्यामिश्र काव्यानुभव व्यक्त करते. आपल्या काव्यरचनेत त्यांनी अनेक प्रयोग करुन पाहिले आहेत. बालकविता, तालचित्रे, आततायी अभंग, सूक्तरचना, मुक्तसुनीते, विरुपिका हे ते रचनाप्रयोग होत. अमृतानुभवासारख्या तत्वकाव्याचे अर्वाचीनीकरण हा सुद्धा करंदीकरांचा एक प्रयोगच आहे. अशा अनेक अंगांनी काव्यनिर्मिती करुन करंदीकरांनी मराठी कवितेत स्वत:ची अशी फार मोलाची भर टाकली आहे. **कोणताही कवी काव्यरचनेच्या संदर्भात प्रयोग करतो तेव्हा तो ते केवळ पोकळीत करीत नाही तर त्या त्या रचना-प्रकारच्या रुढ संकेतव्यूहाच्या पार्श्वभूमीवरच करीत असतो.** रुढ संकेतांचे नव्या संदर्भात पालन-उल्लंघन करतो. या दृष्टीने करंदीकरांनी केलेल्या रचनाप्रयोगांचा अभ्यास होण्याची आवश्यकता आहे.

मराठी कवितेच्या संदर्भात १९४१ ते १९८१ हा कालखंड महत्त्वाचा आहे. या काळात काव्यातील अनुभव, भाषा, प्रतिमा व त्यांचे उपयोग या अंगात नवे परिवर्तन घडून आले. नवे विज्ञान व त्यातून निर्माण झालेल्या श्रद्धा, नव्या मूल्यांबरोबर नैतिक पातळीवरुन झालेली निराशेची जाणीव, मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा परिचय, त्याच्या मर्यादा, भारतीय स्वातंत्र्याची चळवळ आणि गांधीवादाचा उदय अशा विविध प्रकारच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आंदोलनांत मराठी कविता घडत होती. त्यामुळे साहजिकच कवितेचे रुप अंतर्बाह्य पालटू लागले. अनिल, पु.शि. रेगे आदी कवींनी केलेले मुक्तछंदाचे प्रयोग या संदर्भात महत्त्वाचे ठरतात. याच काळात विंदा करंदीकर यांची कविता घडलेली आहे.

'स्वेदगंगा' (१९४९) ते 'विरुपिका' (१९८१) या दोन काव्यसंग्रहांच्या दरम्यान करंदीकरांनी विविध



विं. दा. करंदीकर

प्रकारचे लेखन केले. (१९८५ मध्ये 'अडमतडम' हा त्यांचा बालकवितांचा संग्रह प्रकाशित झाला) या सर्व लेखनातून कोणा एकाच काव्यदृष्टीचे दर्शन घडत नाही. याचे कारण, **मानवी भावनेशी भिडताना करंदीकरांनी कोणता तरी एकच एकारलेला दृष्टिकोन स्वीकारलेला नाही, हे आहे.** या भूमिकेमुळे करंदीकरांना कविता अनेक परींनी निर्माण करता आली. नव्या जाणिवेच्या गरजेनुसार त्यांच्या काव्याची भाषा, छंद, शैली, रचना बदलत गेलेल्या दिसतात. या खुणा 'स्वेदगंगे'पासूनच दिसू लागतात.

करंदीकरांनी ज्या काळात कवितालेखनास प्रारंभ केला त्यावेळी गांधीजींच्या नेतृत्वाखालील राजकीय चळवळींना जोर आलेला होता. त्याचे संस्कार समकालीन

कवींवर घडत होते. यातून आलेल्या भावनिक प्रतिक्रियांना शब्दरुप देऊन साकारलेली कविताच करंदीकरांच्या आजुबाजूला होती. या संस्कारात त्यांची कविता घडत-वाढत असतानाच 'सरोज नवानगरवाली', 'लाव्हा', 'रक्तसमाधी' यांसारख्या नव्या जाणिवा व्यक्त करणाऱ्या कविता त्यांनी लिहिल्या व त्या पारंपरिक कवितेहून वेगळ्या प्रकारच्या होत्या.

१९४७ साली मर्ढेकरांचा 'काही कविता' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्याचा अनेक कवींच्या कवितांवर परिणाम झाला. १९४८ नंतरच्या करंदीकरांच्या कवितेवर जाणिवेच्या आणि भाषेच्याही अंगाने परिणाम झालेला दिसतो. १९४८ सालापर्यंत करंदीकरांच्या कवितेवर साम्यवादी विचारांचा प्रभाव असल्याचे जाणवते. साम्यवादी विचारात मानवाला केंद्रस्थानी मानून, समाजाची विश्वाची व्यवस्था लक्षात घेण्याचा प्रयत्न गृहीत धरलेला असतो. या जाणिवेचे भान करंदीकरांच्या या काळातील कवितांमधील अनुभवांमागे असल्याचे दिसते. तसेच यंत्रसंस्कृतीच्या विधायक व विध्वंसक कार्याचे भानही नवकवितेतील अनुभवामागे आहे. करंदीकरांच्या कवितेवर या जाणिवेचा संस्कार दिसतो.

१९५५ नंतरच्या त्यांच्या कवितेमधील साम्यवादाचा आणि विज्ञाननिष्ठेबद्दलचा उत्साहही कमी कमी झालेला दिसतो. या काळातील त्यांच्या कवितांत एखाद्या विशिष्ट जाणिवेच्या आंतरिक उर्मीमुळे प्रतिभांकित होणाऱ्या अर्थपूर्ण घाटाला महत्त्व मिळू लागले. त्यातूनच 'आततायी अभंग', 'तालचित्रे', 'बालकविता' व 'मुक्तसुनीते' हे विविध काव्यप्रकार निर्माण झाले.

करंदीकरांच्या लेखनाचा ऐन बहराचा कालखंड १९५६ ते ६५ हा मानता येईल. १९६१-६५ या काळात त्यांनी विपुल बालकविता लिहिली. त्याच काळात गटेच्या 'फाउस्ट भाग-१' चे भाषांतर ते मोठ्या गांभीर्याने करीत होते.

'स्वेदगंगा' आणि 'मृद्गंध' मधील कवितांचे नव्या जाणीवेच्या अंगाने वेगवेगळे प्रयोग करीत असतानाच करंदीकर ॲरिस्टॉटलच्या काव्यशास्त्राचे भाषांतर करीत होते. 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र: भाषांतर व भाष्य' हा त्यांचा ग्रंथ १९५७ मध्ये प्रसिद्ध झाला. याच कालखंडाच्या आगेमागे 'स्पर्शाची पालवी' हा लघुनिबंधांचा संग्रह प्रकाशित झाला. तत्कालीन मराठी लघुनिबंधाच्या ज्या काही उणीवा व दोष होते तशा प्रकारच्या उणिवा; दोष असणारे काही निबंध यात आहेत, तसेच लघुनिबंधाची भावी वाटचाल सुचित करणारेही निबंध यात आहेत. 'स्पर्शाची पालवी' 'या इथे', यांसारखे काही निबंध नवकवितेतील प्रकृतीशी नाते सांगणारे आहेत; तर 'चिंचा आणि आवळे', 'घसरत्याचे पाय खोलात' यांसारखे वैचारिक अंगाने जाणारे निबंधही आहेत. **नवकाव्य आणि नवकथा यांच्या विकासाशी या नवलघुनिबंधांचे नाते आहे.**

'आकाशाचा अर्थ' मधील बहुतेक नवलघुनिबंध चिंतनशील वृत्तीने भारावलेले आहेत. या काळातील इतर मराठी लघुनिबंधकारांना लघुनिबंधातील चिंतन आणि निबंधातील विचार यांतील फरक स्पष्ट करता आलेला नाही. तो करंदीकरांना स्पष्टपणे जाणवला आहे. चिंतन ही एखाद्या व्यक्तिमत्त्वाला येणाऱ्या अनुभवातीलच एक प्रक्रिया असते. ती त्या त्या व्यक्तिमत्त्वाच्या स्वभावविशेषांनुसार, रागलोभांनुसार, प्रतिक्रियेनुसार लघुनिबंधात हे चिंतन स्पष्टपणे जाणवते. विशेषत:, 'आकाशाचा अर्थ', 'एका खिळ्याचा क्रूस', 'तू वाहतो आहेस' यांसारख्या लघुनिबंधात ते अधिकच स्पष्ट आहे.

या स्वरुपाचे लेखन करीत असतानाच 'परंपरा आणि नवता' हा त्यांचा ग्रंथ प्रकाशित झाला. आपल्या कवितांविषयी काही स्पष्ट विचार करंदीकरांनी यात मांडले आहेत. वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या निमित्ताने दिलेली

व्याख्याने, टिपणे यांचा या ग्रंथात समावेश आहे. या नंतरचा त्यांचा महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे शेक्सपिअरच्या King Lear चे 'राजा लिअर' हे भाषांतर (१९७५) हा होय. पाश्चात्य वाङ्मयातील अभिजात, दर्जेदार वाङ्मय मराठीत यावे, त्या निमित्ताने वाङ्मयाची धारणाशक्ती वाढावी असा हेतू या भाषांतरामागे आहे. शिवाय, स्वत:च्या कवितांची इंग्रजी भाषांतरे त्यांनी केली. 'Poems of Vinda', Some more poems of Vinda', आणि 'Trimurti' या नावांनी ती भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत. हा सारा कालखंड सामान्यत: जुन्या कवितांच्या भाषांतराचा दिसतो.

या संदर्भातील एक महत्त्वाचा परंतु वेगळा प्रकल्प करंदीकरांनी हाती घेतला होता. तो म्हणजे ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवाचे अर्वाचीनीकरण हा होय. या भाषांतराच्या काळातील काव्यदृष्ट्या महत्त्वाची घटना म्हणजे करंदीकरांचा 'विरुपिका' हा काव्यसंग्रह (१९८१) ही होय. या संग्रहात १९८१ पूर्वीच्या आठ-दहा वर्षांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या विरुपिका एकत्र आणल्या आहेत. 'एखाद्या भावलेला अनुभव, विचार किंवा अवस्था विरुपाच्या आधाराने काव्यरुप झालेली दिसली की तिला विरुपिका म्हणावे' अशी त्यांनी विरुपिकेची व्याख्या दिली आहे. 'काव्याच्या क्षेत्रात आपल्या हातून जे थोडेफार होण्यासारखे होते ते आता होऊन गेले आहे' या भावनेने करंदीकरांनी विरुपिका हा आपला शेवटचाच संग्रह असे म्हटले आहे.

एवढी संख्येने व आवाक्यानेही प्रचंड अशी ग्रंथसंपदा करंदीकरांच्या नावे जमा आहे. त्यातही कवितेच्या प्रांतातील त्यांच्या जाणीवलक्ष्मी काव्याचे मोल अधिक आहे. करंदीकरांचे अनुभवविश्व बहुकेंद्री असल्यामुळे त्यांच्या कवितेत अनेकविध आशयसूत्रे सापडतात. सामाजिक, मानसिक, स्त्रीविषयक, काव्यविषयक ही ती आशयसूत्रे होत. गंभीर असे जीवनचिंतन त्यातून व्यक्त होते. त्यासाठी त्यांनी मुक्तसुनीते, तालचित्रे यांसारखे रचनाप्रयोग केले. त्यांना लवचिक बनविले व त्यात विकासाच्या अनेक शक्यता निर्माण केल्या. मानवी संस्कृतीविषयीचे चिंतन, समग्र मानवी मनाविषयीचे चिंतन अशा व्यापक पृष्ठभूमी लाभलेल्या चिंतनासाठी करंदीकरांनी आपले सूक्ष्मतर प्रतिमांचे समर्थ विश्व उभे केले आहे. आदिप्रतिमा, शब्दप्रतिमा, नादप्रतिमा, रंगप्रतिमा, संपूर्णप्रतिमा आदी प्रतिमांचे अनेक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार त्यांच्या प्रतिमासृष्टीला समृद्ध बनवितात. त्यांच्या ''जातक', 'ध्रुपद' या काव्यसंग्रहातील काव्यप्रतिमांचा विशेष अभ्यास करता येईल. कविता, लघुनिबंध, साहित्यचर्चा, भाषांतरे या साहित्यप्रकारांनी मिळून करंदीकरांचे समग्र लेखनविश्व उभे राहाते. त्यात प्रत्येक साहित्यप्रकाराचा, त्यातील प्रयोगशीलतेचा अनेक अंगांनी विचार करणे शक्य आहे. आपल्या पुढीलांना नवे काही घडविण्याची ताकद देण्याची फार मोठी क्षमता करंदीकरांच्या लेखनात आहे. त्यांच्या लेखनामुळे मराठीची धारणाशक्ती वाढली आहे, हे त्यांचे फार मोठे श्रेय आहे. संख्येने वा आवाक्याने समृद्ध लेखन करणे हे करंदीकरांचे अतिशय महत्त्वपूर्ण कार्य आहेच. **परंतु त्यांच्या लेखनात, अनेक साहित्यप्रकार समृद्ध करण्याची मोठी ऊर्जा आहे. समीक्षा, भाष्य आणि ललित लेखन अशा अंगांनी त्यांचे विचार पुढे नेण्याचे आवाहन करंदीकरांच्या लेखनात आहे.** उदा. करंदीकरांच्या मुक्तसुनीताचा अभ्यास करताना डॉ. विलास सारंग यांच्या प्रतिसुनीतांच्या प्रयोगाचा अन्वय लावता येईल. करंदीकरांनी निर्माण केलेल्या परंपरेतील नवता ही या दृष्टीने पाहता येईल. या स्वरुपाची संशोधनाला आवाहन करणारी लेखनपरंपरा निर्माण करणे यातच कविवर्य विंदा करंदीकर यांचे श्रेष्ठत्व साठविलेले आहे.

**प्रा. ज्योतिका ओझरकर**
'ब्रह्मांड' घोडबंदर रोड, ठाणे ४०० ६०७
दूरध्वनी - ६५८९६६२४

# श्री राघवेन्द्र स्वामी महाराज
# जीवन व कार्य प्रकरण पहिले

*राघवेंद्र स्वामी महाराजांचा भारतीय तत्त्वज्ञान व तत्त्वज्ञान मीमांसा व प्रसार यावरील ठसा अमिट आहे. ज्यांच्या संबंधांतील वेद व संस्कृतीभ्यासक शंकरराव मठांची ही लेखमाला - संपादक*

## द्वैत सिध्दांत वाटचाल

विजय नगरच्या हिंदु साम्राज्याच्या पतनानंतर उत्तर व दक्षिणेकडे म्हणजे पूर्ण हिंदुस्थानातच, हिंदू विचार, संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांना ग्रहण लागलेत देश मृतप्राय झाला, मंदिराकडे दुर्लक्ष झाले. हिंदू विद्वानांना राजाश्रय नसल्यामुळे ते निराधार झाले. आणि धर्माचार्य अंधारात कसेबसे चाचपडू लागले. हिंदू जनता व त्यांच्या धार्मिक संस्थांनी हा सांस्कृतिक दीप उजळत ठेवला होता. तो दक्षिणेतील विजयनगरच्या साम्राज्यामुळेच होय. दक्षिणेतील तीन प्रमुख आचार्यांनी तत्त्वज्ञानाची बैठक व्यापक केली होती. त्यामुळे शत्रूच्या माऱ्यापुढे त्यानी योग्य प्रकारचे तोंड देण्याचे काम केले. हे तीनही आचार्य चिरंतन स्मरणीय व वंदनीय आहेत. कारण त्यांनी हिंदू संस्कृती व धर्म टिकविला. श्रीमत् आद्य शंकराचार्य (खिस्ताब्द ७८८-८२०) हे एक अजोड वेदान्ती होते. यानी अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रचार केला आणि प्रसार आसेतु हिमाचल केला. इतकेच नव्हे यांनी देशाच्या चार दिशेला शैक्षणिक स्वरुपाच्या मठांची स्थापना केली. बद्रीनाथ (जोशी मठ) द्वारका, पुरी व श्रृंगेरी येथील मठातून आजही कार्य चालू आहे. दुसरे आचार्य श्रीरामानुजाचार्य (खिस्ताब्द १०१७-११३७) यांनी विशिष्टाद्वैत या हिंदू तत्त्वज्ञानाची शिकवण दिली. वैष्णव पंथ स्थापिला. भक्ती मार्गाचा अवलंब केला. यांना बरेच अनुयायी मिळाले. तिसरे आचार्य श्री मध्वाचार्य (खिस्ताब्द १२३८-१३०७) यानी द्वैत मत सिद्धान्त प्रस्थापित केला. द्वैत सिध्दान्त व्यापक प्रमाणावर प्रसारित झाला. त्याची प्रगती देशात दक्षिणोत्तर झाली. कारण या सिध्दान्ताची दोन प्रमुख तत्त्वे आहेत, ती म्हणजे आत्यंतिक भक्ती व प्रतिपत्ती - शरणागती. भक्तीचा प्रसार अनेकांना आवडला व अनेकांनी यांचे अनुयायित्व पत्करले. प्रलहादांनी विशद केलेले भक्ती तत्वच या सिद्धांतात आढळते,

श्रवणं कीर्तनं विष्णो: स्मरणं पाद सेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यं आत्म निवेदनम् ।

ही नवविधा भक्ती ईश्वर आराधनेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असल्याने लोकांनी याचा अंगिकार केला.

द्वैत भक्तीच्या प्रसाराचा काळ हा संक्रमणावस्थेचा होता. कोरड्या शब्द ज्ञानाने समाधान होत नव्हते. त्याची जागा भक्तीने घेतली. ही जीवनात प्रत्यक्ष उतरविण्याचा प्रयत्न होऊ लागला. यामुळे धार्मिक जीवन अधिक सुदृढ पायावर उभे राहिले.

## द्वैत सिद्धान्त मत

द्वैत संप्रदायाची तत्त्वे थोडक्यात अशी आहेत. श्रीहरी हा सर्वेसर्वा म्हणजे सर्वोत्तम. हे जग सत्य आहे. जीवात भेद आहेत, सर्व जीव हे श्रीहरीचे दास आहेत. प्रत्येक वस्तुमानातील विविधता ही अपरिवर्तनीय व अंतिम आहे. मोक्ष म्हणजेच अंतिम ध्येय, तेच खरे सुख, भक्तीने मुक्तीचा मार्ग चोखाळता येतो या सिद्धांतांनी तीन प्रमाण मानले आहेत. प्रत्यक्ष, अनुमान व शब्द, श्रीहरी केवळ श्रुतीच्या (वेदाच्या) माध्यमातून जाणला जातो.

श्री मध्वमते हरि: परतर: सत्यं जगत् तत्त्वतो ।
भेदो जीवगणा: हरे: अनुचरा: नीचोच्च भावंगता:।

मुक्ति:नैज सुखानुभूति: अमला भक्तिश्च तत् साधनम् ।
प्रत्यक्षादि मितयं प्रमाणं मायैक वेद्यो हरि:।

### द्वैतमत प्रसार

द्वैत तत्त्वज्ञानाचे मूलभूत आधार सत्य व भक्तिभावनेचा प्रसार हे दास कूटानी प्रस्थापित केले. मध्वाचार्यांनि स्वत: मंदिरे व मठ तसेच आश्रम बांधले व शिक्षण देण्याचा प्रघात सुरु केला. उडुपीत आठ प्रमुख मठ आहेत. सर्व सामान्य माणसाला या मठातून शिक्षण मिळण्याची सोय करण्यात आली. फलिमरु, अदमरु, कृष्णपुर, पुट्टिगे, शिरुर, सोदे, कनिमूर व पेजावर अशी तेथील मठांची नांवे आहेत. या मठातून नित्य श्रीकृष्णाची पूजा व द्वैत सिद्धांताचा प्रचार या दोन मुख्य गोष्टी आज तागायत अविरत चालू आहेत.

मध्वाचार्यांना प्रथितयश असे अनेक शिष्य लाभले. त्यांनी द्वैत सिध्दान्त प्रभावीपणे मांडला व आम जनतेत त्याचा प्रचार केला. या आठ मठां व्यतिरिक्त मध्व शिष्याकडून शिक्षण केन्द्राची निर्मिती झाली. त्या प्रकांड शिष्यांच्या नावे ती चालत राहिली. उदाहरणार्थ व्यासराय मठ, राघवेन्द्र स्वामी मठ, उत्तरादि मठ, हे मठ जणू प्रस्थान त्रयी सारखे उपयुक्त ठरले. यांच्या मुळे द्वैष सिद्धांताला बळकटी आली.

### शैक्षणिक स्वरुपाचे मठ

व्यासराय मठ, व राघवेन्द्र स्वामी मठ हे दोन मठ विशेष प्रसिद्धीला आले. कारण या मठांचे प्रवर्तक थोर विद्याविभूषित होते. ते परम सहिष्णु होते. व्यासरायांनी कनकदासा सारख्या मेंढपाळाला भक्ति मार्गात उत्तेजन दिले. बसव भटाकडून शिवलिंग स्वीकारले व मठात त्याची स्थापना केली. कृष्णदेवराय यांचे जीव कुयोगातून वाचविले. ते जग सत्य मानीत. यामुळे सन्मार्गावर आचरण करण्यास विजयनगर येथील जनता उद्युक्त झाली. भारताच्या सांस्कृतिक जीवनावर व्यास रायांचा चिरंतन ठसा उमटलेला आहे. ते वयाच्या ९२व्या वर्षी निधन पावले. त्यांची हंपी येथे वृंदावनाच्या ठिकाणी समाधी आहे. त्यांच्या पश्चात् पद्मनाभ तीर्थ, कवींद्र, वागीश तीर्थ रघुवर्म, रामचंद्रतीर्थ, सुरेन्द्रतीर्थ (हे राघवेन्द्रस्वामीचे गुरु) श्री निवासतीर्थ, धीवरतीर्थ इत्यादी प्रवर्तक झाले.

### विजयनगर साम्राज्याचा पाडाव व नंतर

विजय नगरात हिंदुधर्म तत्त्वज्ञान व संस्कृती यांचे जतन फार खडतरपणे केले जात असे. कारण सतत सभोवताली असलेल्या मुसलमान राज्यांचा धाक होता. आणि मोंगल साम्राज्याचा विस्तार अव्याहत चालू होता. केव्हा एकदा हे हिंदू साम्राज्य नष्ट करुन गिळंकृत करता येईल याची वाटत ते पाहात होते. तशी संधी तालिकोट येथील पराभवामुळे त्यांना मिळाली. मुसलमानानी हंपी शहर लुटले. तेथील मंदिरांचा विध्वंस केला. संपूर्ण शहर बेचिराख करुन टाकले. आज हंपी उजाड अवस्थेत आहे. तेथील विद्वान मंडळी इतस्तत: विखुरली गेली. काही लोक तंजावरला गेले. तेथे हिंदूंचे राज्य होते. काही मांडलिक छोटे संस्थानिक बनले. राजकीय एकता व सामाजिक भाव पूर्ण लयाला गेले. हाच दैवदुर्विलास. एकाकाळचे वैभवातील साम्राज्य पार धुळीला मिळाले. वैभव सूर्याचा कायमचा अस्त झाला. सर्वत्र बेदिली माजली.

काहि मांडलिक राजे ज्या प्रमाणे स्वतंत्र होऊन संस्थानिक झाले त्या प्रमाणे तत्त्वज्ञान क्षेत्रातही ही वृत्ती बळावली. कोणी अद्वैताचा, कोणी विशिष्टाद्वैताचा, कोणी द्वैताचा प्रामुख्याने प्रचार करु लागले. आपलेच तत्त्वज्ञान सर्वश्रेष्ठ कसे आहे याचे प्रतिपादन करु लागले. धार्मिक असहिष्णुता, पंथीय दृष्टिकोन सत्यापलाप व कोणत्याही प्रश्नाकडे सखोल विचार न करता वर वरचा मार्ग त्वरित कसा चोखाळता येईल हे पाहिले जाऊ लागल्याने सत्याला थारा नाहीसा झाला. या मुळे लोकांचा कशावरही विश्वास

उरला नाही. संत महंताच्या वचनानाही तीच गतीप्राप्त झाली.

विजयनगर साम्राज्याचे पद्धतशीर निखंदन झाल्यामुळे एक मोठी पोकळी निर्माण झाली. धर्म विचाराला गळती लागली. भक्ति मार्ग संपुष्टात आला मानवातील पशुत्वाला मोकळे रान प्राप्त झाले. आणि संपूर्ण सांस्कृतिक जीवनाचा विध्वंस झाला. नगराचे थडगे झाले. लोकाना ही सारी माया वाटू लागली. सुकाणु विरहित ही बोट असल्याचे त्यांना भासले. व्यासतीर्थ व दासकूट यानी द्वैत सांप्रदायाचा पाया घातला होता. तो पूर्ण उखडला गेला. इतर मतमतांतरानी उचल खाल्ली.

वैष्णव तत्त्वज्ञान व विष्णुभक्ती पुन: प्रस्थापित करण्यासाठी एखादा महान योगीच अवतरावा व त्याच्या कडूनच पुन: द्वैत गताची स्थापना व्हावी असे लोकांना वाटू लागले. हे त्यांचे स्वप्न राघवेन्द्र स्वामींनी सर्वाथाने पूर्ण केले. इतकेच नव्हे त्यांचे मंत्रालय आजही विष्णु भक्तांना प्रेरणा देणारे स्थान ठरले आहे. त्यांनी द्वैत सिद्धांताची ध्वजा फडकविली. भक्तिद्वारे अनेकांची दु:खे कमी केली मानवातील क्षुद्र वृत्ती नष्ट करुन त्यांना विष्णु भक्त बनविले. अशा व्यक्तिमत्वाचा जीवनपट उलगडून पाहण्याची त्यांची घडण कशी झाली. ते या पक्षाला कसे पोचले याचा बोध होईल व उद्बोधकही ठरेल.

## श्री राघवेन्द्र स्वामी महाराज जीवन व कार्य (प्रकरण दुसरे)

### विज्ञान अपुरे आहे

विज्ञानाने सांप्रत केलेली प्रगती, त्याने पुरस्कारलेला कार्य-कारण-भाव हे सारे लक्षात घेऊनही, या विश्वात अशा अनेक गोष्टी आहेत की ज्याचा उलगडा करताना मन द्विधा होते. आणि त्यांची उप्पत्ती लावणेही कठीण होते. वैज्ञानिक दृष्टीच्या पलीकडच्या गोष्टी सोडवताना तिची मर्यादितता प्रत्ययाला येते, व नवीन प्रश्न उपस्थित करुन देते. अद्याप विश्व कर्त्याबद्दलचा असलेला विश्वास कमी न झाल्याने विज्ञानाने मांडलेली उप्पत्ती अस्वीकार्ह ठरते.

आम्ही आमच्या इंद्रियांनी पाहू शकत नाही, ऐकू शकत नाही अशा कितीतरी गोष्टी विश्वात आहेत. सांप्रत ध्वनिलहरी वा चित्रण योग्य माध्यमातून ऐकू वा पाहू शकतो. तेव्हा परमात्मा पहाण्यासाठी ऋषिमुनींची दृष्टी स्वीकारली पाहिजे. या गोष्टीला विज्ञान गूढ म्हणून मोकळे होते. भारतीय संस्कृती तर्क, अनुभव, अंतर्ज्ञान व वेदांची प्रमाणता या सर्वांचा यथार्थ ज्ञानासाठी उपयोग करते. वेदान्त केवळ तर्कज्ञान नाही, ते अंतिम सत्याचे ज्ञान आहे. म्हणून केवळ तर्काने हे जाणून घेता येणार नाही. तर्क हा ज्ञान प्राप्तीचा एक भाग आहे. तर्काचा उपयोग वेदान्त जरुर करुन घेत आहे. वेदान्त मानवाचे सारे अनुभव लक्षात घेतो. ऋषी हा द्रष्टा आहे. सामान्यांना जे शक्य होत नाही ते हा पाहू शकतो.

सांप्रतकाळचे दुर्दैव असे आहे की जे तोतये लोक आहेत त्यांची प्रतिष्ठा वा आदर करण्यात येतो. चमत्कार करुन दाखविणारे चटकन् लोकांना आकर्षित करतात, आणि खरा सज्जन हा बाजूला रहातो.

### स्वामीजींचे तीन अवतार

द्वैत सिद्धान्ताचा परिचय झाला असल्यासच श्री राघवेन्द्र स्वामींचे कार्य लक्षात येईल. जन्म मरण वा पुनर्जन्म या फेऱ्यातून आपली सुटका व्हावी ही कल्पना ज्यांची पकड घेऊ शकत नाही त्यांना स्वामी महाराजांचा हा तिसरा अवतार आहे याचे आकलन होणार नाही. तसेच त्यांचा अवतार कशासाठी झाला हेही ध्यानात येणार नाही. **अवतार ही काही कवि कल्पना नाही. प्रत्यक्षात मानव अनेक जन्म घेत असतो. मात्र त्याला पूर्व जन्माची जाणीव असत नाही.** म्हणून गीतेत असे म्हटले आहे.

विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषा । १५-१०

सामान्यांना ही गोष्ट कळत नाही मात्र असामान्याना ही गोष्ट सुखैनैव कळते.

स्वामींचा पहिला अवतार भक्त प्रल्हादाचा, (हिरण्यकश्यपुचा मुलगा) दुसरा अवतार -व्यासराय, विजयनगर साम्राज्यातील महान् संत. तिसरा अवतार - राघवेन्द्र स्वामी, मंत्रालयातील भव्य विभूतिमत्त्व (स्वामींच्या निवास स्थानाला मंत्रालय असे नाव आहे ) स्वामींचा हा जन्म केवळ अपघाताने झाला नव्हता. **जनतेतील अज्ञान दूर करुन त्यांच्यात ईश्वर निष्ठा निर्माण करण्यासाठी** होता. स्वामींच्या ठिकाणी अलौकिक विष्णुभक्ती त्यांच्या पूर्व जन्मानुसार प्राप्त झालेली होती. विज्ञानाला अवतार ही कल्पना वेडगळ वाटते. मात्र या बद्दलचे अज्ञान दूर होताच सत्यता ध्यानात आल्यावाचून राहणार नाही.

**इतिहासाबद्दल अनास्था**

हिंदुस्थानात ऐतिहासिक लिखाणविषयी अनास्था आढळते. कारण स्वत:संबंधीची व्यक्तिगत माहिती ही अनुपयुक्त, आपण कार्यरुपाने चिरंतन राहणे हेच योग्य असे येथील महात्म्याना वाटते. **आत्मचरित्र लिखाण ही अगदी अर्वाचीन प्रथा आहे**. याला श्री राघवेन्द्र स्वामीही अपवाद नाहीत. त्यांच्या संबंधि काही लिहावयाचे झाल्यास इकडून तिकडून माहिती गोळा करावी लागते. ती संशोधित करुन जन्म, जन्मस्थळ, कार्य इत्यादी निश्चित कराव्या लागतात. श्री नरसिंह आचार्य यानी लिहिलेला 'राघवेन्द्र विजय' या ग्रंथाचा या कामी बराचसा उपयोग होऊ शकतो.

**स्वामीजींचे पूर्वज -**

स्वामीजींच्या कुटुंबातील मूळ पुरुष विजयनगरात राहात होते. सोळावे शतक हा एक वैभवशाली काळ होता. ख्रिस्ताब्द १५१९ ते १५३० या सुमारास श्री कृष्णभट नावाचे एक ब्राह्मण विजयनगरची राजधानी हंपी येथे राहात होते. ते विद्वान होते तसेच ते उत्तम वीणावादक होते. श्री कृष्णदेवराय यांच्या दरबारात संगीतक म्हणून ते आश्रयाला होते. ते द्वैत मताचे असून विष्णुभक्त होते. त्यांचे सुपुत्र श्री कनक चक्रभट आपल्या वडिला सारखे पंडित व उत्तम वीणावादक होते. वडिलांच्या पश्चात दरबारात ते वादक म्हणून आश्रित झाले. त्यांना श्री तिम्मण्णा नावाचा एकुलता एक मुलगा होता. याचा आवाज सुरेल होता. संगीत गायक या नात्याने दरबारात त्याची नियुक्ती झाली. गोपम्मा या सुंदर मुलीशी तिम्मणांचा विवाह झाला. त्यांना दोन मुले झाली. एक मुलगा व दुसरी मुलगी. श्री तिम्मणांना दरबारात फार दिवस राहता आले नाही. मुसलमानी आक्रमणाने विजयनगरचा पराजय झाला. जीव वाचविण्यासाठी श्री तिम्मण्णा आपल्या कुटुंबासह तंजावरला पळून आले. त्यांची दरबारातील उपजीविका नष्ट झाली. बरोबर आणलेल्या काही पुंजीवर थोडे दिवस कशीबशी गुजराण केली. भुवनगिरी नावाच्या एका खेड्यात घर करुन ते राहिले. तेथे काही उद्योगधंदा नव्हता. जवळचे सोने, जवाहीर खर्ची पडू लागले. अद्याप मुलीचे लग्न व्हावयाचे होते, मुलाच्या शिक्षणाची व्यवस्था करावयाची होती. मात्र आर्थिक सोय अशी काहीच नव्हती, संगीत शिकवून मिळणारा मोबदला अत्यल्प होता, थोडक्यात दुःख दारिद्र्य यांनी या कुटुंबाला ग्रासले. मुलगा गुरुराज याला गुरुकुलात पाठवून दिले व मुलीचे लग्न लक्ष्मी नरसिंहाचार्य यांच्याशी करुन दिले.

**अपत्यासाठी तिरुपतीची प्रार्थना**

दरिद्री झालेले हे कुटुंब - मुलगा शिक्षणासाठी बाहेर गेला, मुलीचे लग्न होऊन ती गेली. आता त्यांना एकाकी वाटू लागले, त्यांना एका मुलाची आवश्यकता वाटू लागली. तिरुपतीला साकडे घालण्यासाठी ती उभयता तिथे गेली. तिरुपतीची मनोभावे सेवा व उपासना केली.

मनात एकच विचार धरुन हे दांपत्य वागले. तिरुपती प्रसन्न होऊन आपल्याला एक मुलगा द्यावा. एके दिवशी श्री वेंकटेश तिम्मणांच्या स्वप्नात आले व तुमची मनोकामना पूर्ण होईल, तुम्ही आता भुवनगिरीला परत जा असे सांगितले. तिम्मण्णाने हे स्वप्न आपल्या बायकोला सांगितले. अत्यंत आनंदाने हे दांपत्य भुवनगिरीला परतले श्री वेंकटेशाच्या कृपेने त्याना मुलगा झाला. **खिस्ताद्ध १५९५ साली या मुलाचा जन्म झाला. हाच पुढील काळात मोठा स्वामी म्हणून प्रख्यात झाला.** त्यानी या मुलाचे नाव वेंकटेश ठेविले. हा श्री गिरिवेंकटेशाच्या प्रसादाने झाला असल्याने मुळाचे नांव वेंकटेश ठेविले. या मुळावर योग्य ते संस्कार करण्यात आले व शिक्षणही देण्यात आले. त्यावेळी तेथे कानडी व संस्कृत भाषा प्रचलित होते. वेंकटेशाचे प्राथमिक शिक्षण झाले. थोड्याच काळात उपनयन झाले. व पुढील शिक्षण सुरु झाले. (खिस्ताद्ध १६०३)

### गृहस्थिती

मोठा मुलगा गुरुराज शिक्षण पूर्ण करुन घरी परतला. त्याचे लग्न करण्यात आले. वेंकटेश सहा वर्षांचा असताना तिम्मण्णांचे निधन झाले. कुटुंबात दारिद्र होतेच. त्यात ही एक आपत्ती निर्माण झाली. गुरुराजानाही उद्योगधंदा नव्हता. कुटुंब कसे चालवावे हा प्रश्न उभा राहिला. भावाचे शिक्षण आईचा सांभाळ कसे होईल ही विवंचना होती. धाकट्या भावाचे शिक्षण आपला मेव्हणा श्री लक्ष्मीनरसिंह आचार्य यांच्याकडे सोपविले. भुवनगिरी ते मदुराई ही मजल वेंकटेशानी गाठली. काही विद्यार्थ्यांची शिकवणी करुन गुरुराजाने चरितार्थ सुरु केला.

### वेंकटेशाचे शिक्षण (संन्यस्त पूर्वकाळ)

वेंकटेशाला वेंकण्णा म्हणत याचा संन्यास पूर्व काळ दैन्य व दारिद्र्याचा होता. या काळात समाधान मानण्यासारखी एकच गोष्ट म्हणजे त्याचे अखंड चाललेले अध्ययन. या दारिद्र्यामुळेच मानवाच्या ठिकाणी नश्वर भौतिकतेचे वैय्यर्थ ध्यानात येते. व त्याच्या ठिकाणी अध्यात्मिक विचार स्थिर होऊ लागतात. दारिद्र्यात आपल्या बरोबरीच्या बांधवांची काय दुर्दशा होत असावी याची जाणीव येते. वेंकण्णा श्री नरसिंह आचार्यांच्या कडे काही काम धंद्यासाठी गेले नव्हते. तिथे शास्त्राध्ययन करण्याकरता गेले होते. आपणाला शिकून पूर्णत्व प्राप्त करुन घेतले पाहिजे याची जाण त्यांना होती. या मनाच्या दृढतेमुळे त्यांची घडण पूर्णतेला जाऊ शकली.

सुरुवातीला वेंकण्णा यांनी संस्कृत शिकण्याचे ठरविले. भाषा, साहित्य, काव्य या नंतर मीमांसा, तर्क, व अर्थशास्त्र याचा अभ्यास केला. तत्कालीन शिक्षण ज्या स्वरुपाचे होते त्यात वेंकण्णा तरबेज झाले. वेंकण्णाची बुद्धी तीव्र होती. त्यांना सहजरित्या विषय समजत गेले. त्याने आपले विद्यार्थी जीवन अध्यपनात पालविले. इतर मुले उपजीविका प्राप्तीसाठी शिकत होती. भौतिक जीवन समृद्ध करणे एवढाच त्या मुलांचे हेतू होता. त्यामुळे इतर गोष्टीत त्यांचा वेळ जात असे. वेंकण्णा यांनी योगाचा अभ्यास केला. तो फक्त खेळण्यासाठी मुलांबरोबर जात असे. शिक्षणाची मर्यादा संपत आली. त्याच्या बुद्धीची प्रगलभता पाहून त्याला तात्विक विवेचनासाठी - मध्वमत व वैष्णव मत समजावून घेण्यासाठी, पुढील अभ्यासासाठी वेंकण्णाला सुधीन्द्रतीर्थांकडे पाठवावयाचे ठरविले. ते मध्वमठाचे स्वामी होते. त्यांचा काळ खिस्ताब्द १५९५ ते १६२३ मानला जातो ते मध्वाचार्यांच्या शिष्य परंपरेतले होते, वेंकण्णा सुधीन्द्र स्वामींकडे आले.

### सुधीन्द्र स्वामींनी वेंकण्णाला आपला शिष्य मानले

सुधीन्द्र स्वामी नी वेंकण्णाला पाहताच हा तरुण, संप्रदायाच्या प्रचाराला अत्यंत योग्य आहे हे ओळखले.

त्यांनी वेंकण्णाला आपला शिष्य करुन घेतला, वेंकण्णाला त्यानी सारे ज्ञान दिले, स्वामींच्या ताब्यात मुलाला सोपविल्याबद्दल श्री लक्ष्मीनरसिंह यांना बरे वाटले. अशा प्रकारे कुंभकोणम् येथे वेंकण्णांच्या शिक्षणाचा दुसरा टप्पा सुरु झाला. त्या काळी कुंभकोणम् एक मोठे शिक्षणाचे केंद्र होते. वेंकण्णा आपल्या गुरुचे आवडते शिष्य झाले. हीच गोष्ट इतर विद्यार्थ्यांमध्ये मत्सराची ठरली. वेंकण्णा गरीब होते. त्यांच्याकडे वापरावयास विशेष कपडे नव्हते. पांघरावयास चादर वा शाल नव्हती. तरी देखील हा गुरुच्या आवडीचा हे इतर मुलांना पाहावले नाही. त्यांना ही मुले एकाकी पाडत. वेंकण्णा आपल्या अभ्यासात मग्न असे. तो एकटाच झोपत असे व एकाकी जगत असे.

### शिष्याची हुशारी गुरुच्या ध्यानात आली

एकदा सुधीन्द्र न्यायपाठ देत होते. एके ठिकाणी जरा शंका येत असल्याने त्यांनी त्या दिवशी पाठशाळा घेतली नाही. सुधीन्द्र त्या गोष्टीवर विचार करीत होते. परंतु त्यांना समाधानकारक स्पष्टीकरण मिळेना. त्या दिवशी विद्यार्थी गृहाची तपासणी करण्याची त्यांना लहर आली. एकंदर विद्यार्थीगृह कसे आहे हे पाहावे असे त्यांना वाटले. विद्यार्थी फावल्या वेळात काम करतात हे जाणण्याची त्यांना उत्कंठा होती. ते बऱ्याच रात्री तेथे आले. सर्वत्र सामसूम होते. वेंकण्णा मात्र एका गवताच्या चटईवर एकाकी झोपला होता. त्याच्या जवळ पांघरुणही नव्हते. ते थंडीचे दिवस होते. त्याच्या शेजारी त्याची टिपण वही होती. सुधीन्द्र स्वामींनी त्यातील पाने उलटून पाहिली. त्यांना आश्चर्य वाटले आपणाला जो प्रश्न पडला होता इथे त्याचा उलगडा आहे. जे अनिर्वचनीय मानले गेले त्याचा बोध झाला. त्यांचा प्रश्न सुटला. त्यांनी ती वही घेतली. आपल्या अंगावरील शाल वेंकण्णावर घातली व तेथून ते गेले.

दुसऱ्या दिवशी वेंकण्णाच्या मित्रांना एक टवाळीचा विषय मिळाला. वेंकण्णा रात्री बराच वेळ जागत बसला होता म्हणून त्याला लवकर जाग आली नाही. त्याच्या अंगावर शाल पाहून त्यांनी ती कदाचित चोरली असावी अशी शंका त्या मुलाना आली. सर्व मुले वेळेवर पाठशाळेत दाखल झाली. वेंकण्णा आले नाहीत. सुधीन्द्र तीर्थ पाठशाळेत आले, वेंकण्णा आले नसल्याचे त्यांच्या ध्यानात आले. ते गंभीर झाले. मुले चुपचाप बसली. आता गुरु बहुतकरुन वेंकण्णाला शाल चोरल्याबद्दल कठोर शिक्षा सांगतील असे मुलाना वाटले. पंधरा वीस मिनिटे स्तब्धतेत गेली. कोणी काही बोलेना. गुरु ध्यानस्थ स्थितीत बसले. मुले त्यांच्याकडे शांतपणे बघत बसली. अर्ध्या तासानंतर वेंकण्णा जोरात ओरडत येत म्हणाला - गुरुजी मी शाल चोरली नाही, मला माहीत नाही. मी रात्री उशीरा झोपलो मला जाग आली नाही. मला क्षमा करा. वेंकण्णा हातात शाल घेऊन गुरुजीकडे धावला. शाल समोर ठेवून त्यांना दंडवत घातले. गुरुजींनी त्याला उठविले. आपली शाल घेतली. प्रात:कालीन विधी नंतर पाठशाळेत यावयास सांगितले. गुरुजींनी पाठ सुरु केला.

काल आपला गोंधळ कुठे झाला व तो कसा सुटला हे गुरुजींनी सांगितले. मला याचे उत्तर वेंकण्णाच्या वहीत पाहावयास मिळाले. वेंकण्णा आल्यावर गुरुजींनी त्याला आलिंगन दिले. त्याला त्याची वही दाखविली, व शाल मीच तुझ्या अंगावर घातली होती हे ही सांगून टाकले. मुले आश्चर्य चकित झाली. गुरुजींनी सांगितले वेंकण्णा तुझे भाष्य पुढे लिही. भगवान कृष्ण, गुरु मध्वाचार्य यांची कृपा तुझ्यावर राहील. तुझे पुस्तक परिमल नावाने प्रसिद्ध होईल, आणि हा परिमल (सुगंध) दरवळत राहो, वेंकण्णा परिमलाचार्य म्हणून ओळखू जाऊ लागले. गुरुजींनी शाल पांघरुन त्याचा सत्कार केला. वेंकण्णाने पुढील काळात 'न्याय सुधा' नावाचे भाष्य लिहिले, वेंकण्णा आता पदवी उत्तीर्ण होणार यावेळी हे घडले. या नंतर काही दिवसांनी गुरुजींनी त्याला घरी जाण्यास अनुज्ञा दिली.

(पृष्ठ क्र. १६वर)

# वाहता वाहता वाहे ... अेक सत्य कथा

*निसर्गाच्या रौद्र रुपाशी टक्कर देत जीवाला आकंठ थरारुन टाकणारा आहे. श्री. ठाकूर निसर्गमित्र असल्याने व पट्टीचे गिर्यारोहक असल्याने या कठीण प्रसंगातून पार झाले. हा थरार अनुभव, त्यांच्याच शब्दात - संपादक*

लहानपणी बालकवींच्या निसर्गकविता खूप आवडायच्या. त्यांनी शब्दबद्ध केलेलं निसर्गाच वर्णन मनाला वेडावून जायचं. त्यांच शब्द सामर्थ्य होतच तसं. वाऱ्याचा वेग, पाण्याचा प्रवाह, मातीचा मृद्गंध, झाडांची सळसळ ओढ्यांची खळखळ, पक्षांची किलबिल, अवखळ वाटा अन् मृदुमुलायम मखमली हिरवळ या सर्वांनी भरून राहिलेलं लयबद्ध काव्य वाचताना मन डोलायला लागे, अन् ती कविता मनात कायम रूजून बसे. मग पुढे निसर्गात फिरताना अथवा खेळताना त्या कविता सहजपणे ओठावर खेळत रहात. त्यातीलच अेक 'निर्झरास' ही कविता मनमोहून टाकणारी आहे.

**पुढे निसर्गात फिरताना बालकविंच्या या कविता ऋतुमानाप्रमाणे साक्षात्कारी स्वरूपात प्रत्यक्ष दिसू लागल्या.** बालकवी हे बऱ्याचदा वेळोवेळी खंडाळ्यास येत असत. तेथील निसर्गात रमत असत. अशाच अेका क्षणी त्यांनी 'निर्झरास' ही कविता लिहिली असावी. खंडाळा-लोणावळ्याच्या डोंगरात उगम पावणाऱ्या उल्हास नदीचा सुरुवातीचा प्रवास हा निर्झरातल्या वर्णनाप्रमाणे जाणवतो.

'घे लोळण खडकावरती। दरीदरीतूनी घुमवित येई । घेत लतावलयी फुगड्या ।' इत्यादी वर्णन प्रत्यक्ष जसेच्या तसे दृष्टीस पहावयास मिळते. आणि मग निर्झर ही कविता मनात रूंजी घालू लागते. मनात प्रतिबिंबित झालेले दृश्य परत परत पहाण्याचा मोह होऊन पुन्हा पुन्हा त्या ठिकाणी जाण्याची इच्छा होऊ लागते.

उल्हास नदीचा हा प्रवाह खंडाळा-लोणावळामधल्या दरीकडे वळतो. पुढे तो दगड धोंड्यातून खाली उतरत जातो. मध्ये छोट्या कड्यावरून उडी घेत, वळत वळत मध्येच लहान डबकी-तळी तयार करून पुढे सरकत जातो. असा थोडा फार प्रवास करत, आजुबाजूच्या झाडेवेलींशी खेळत तो अेका मोठ्या कड्यापाशी येतो आणि खालच्या दरीत धबधब्याच्या रूपाने झोकून देतो. पाचशे फूट खोली गाठणारा हा धबधबा आपल्याला गारठवून टाकणारा आहे. त्याचा आवाज संपूर्ण दरीभर घुमत असतो. पाणी खळाळून वहात असते. वरून पाऊस सुरु असतो. सारा आसमंत चिंब चिंब झालेला असतो. आपणही त्यात ओलेचिंब होण्यासारखा दुसरा आनंद नाही.

तसं हे माझ आवडत ठिकाण. अैन पावसाळ्यात पांच-सात वेळा तरी या ठिकाणी जाण होत असे. अशाच अेका वर्षी, अेका वेळी सात-आठ मित्रांना बरोबर घेऊन या ठिकाणी आलो होतो.

आषाढ अैन पावसाचा मास. तशातच नक्षत्रही तुफानी पाऊस धारांचे होते. त्या दिवशी पावसाने चांगलाच जोर धरला होता. घरून निघाल्यापासून पावसाने पाठ धरली होती. अशा या पाऊस ओल्या आनंदी वातावरणात रमतगमत आमची टोळी खंडाळा स्टेशनवर उतरली. हसतखेळत आम्ही मुंबई-पुणे रस्तावर आलो. समोरच कोपऱ्यावरच्या भजीपॉईंट या धाब्यावर मस्तपैकी भजीपाव व चहा घेतला. पोटोबा झाल्यावर आमचे पाय लोणावळ्याच्या दिशेने चालू लागले. दोन अडीच

किलोमिटरवर अेका बंगल्याच्या गेटपाशीच मुख्य रस्त्याच्या डाव्या बाजूला अेक कच्चा रस्ता खाली उतरतो. पुढे डाव्या हाताला वळून दरीकडे जातो. येथेच हा निर्झर आपले हसतखेळत स्वागत करतो. निर्झर पाहून सारेच आनंदीत झाले. त्याच्या भोवती बागडू लागले. वरून पाऊस सुरूच होता. सारेच खळाळणाऱ्या पाण्याच्या तालावर नादावले होते. माझ्या बरोबर आलेले मित्र प्रथमच हा असा अनुभव घेत होते. त्यामुळे ते अधिकच रमले होते.

थोड्या वेळाने मी त्यांना दरीच्या आंत थोडे खालच्या बाजूला, डोंगराच्या झाडीतून वाट काढत नेले. जेथे खाली उतरलो त्या ठिकाणी डाव्या बाजूने येणारा ओढा धबधब्याच्या रुपाने कोसळत होता. तर उजव्या हाताने येणारा निर्झरही धबधबा होऊन खाली पडत होता. पुढे दोन्ही बाजूचे पाणी अेकत्र होऊन अधिक जोरात प्रवाही झाले होते. लहान मोठ्या दगडधोंड्यातून काट्याकुट्यातून स्वत:भोवती गिरक्या घेत पाणी दरीच्या टोकाच्या दिशेने वहात होते.

पहिल्या धबधब्याखाली मनसोक्त भिजल्यावर उजव्या बाजूला मूळ निर्झराच्या धबधब्यात येण्यासाठी भलेमोठे दगड ओलांडत धबधब्याच्या खालच्या तळ्याच्या काठावर आम्ही येऊन बसलो. दगडांना चांगली शेवाळी धरली होती. पाय ठेवताना फार जपून चालावे लागत होते. पाय सरकलाच तर चांगलेच दणकून आपटण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

पावसानेही आता चांगलाच जोर धरला होता. पाणी वाढत होते. धबधबे अधिक जोरात पडू लागले होते. दोन्ही बाजूने डोंगर असल्याने त्या मधल्या भागात फारशी मोकळी जागा नसली तरी जे दगडगोटे अेकमेकांना खेटून बसले होते त्यांच्या मध्येही पाणी भरू लागले होते. पाण्याचे तुषार, बाष्प आणि खळाळणाऱ्या पाण्याचा व पावसाच्या आवाजाने ती दरी व्यापून गेली होती. आम्हीही त्यात पूर्णपणे रंगून गेलो होतो.

माझ्याशिवाय बाकी इतरांना पोहता येत नव्हते. त्या ठिकाणी पोहणेही शक्य नव्हते. थोडे फार तरंगणेच शक्य होते. त्यामुळे माझ्याबरोबरचे मित्र हे बाजूला काठावर बसून पाण्यात खेळत, पावसात भिजण्यात आनंदून गेले होते. पाऊसही वाढला होता. व पाणीही वाढले होते. पाण्यालाही चांगलाच वेग आला होता. निर्झर आता निर्झर राहिला नव्हता. त्याने आता हळूहळू रौद्र रूप धारण करण्यास सुरवात केली होती. या साऱ्या बदलत्या रुपाची रमलेल्या आम्हाला कल्पना आली नाही. आम्ही आमच्याच नादात होतो.

मूळ धबधब्याखाली जाण्यासाठी त्याच्या खाली तयार झालेल्या तळ्यात मी उतरलो सात-आठ हात मारतच मी धबधबा गाठला. धबधब्यातून पाणी जोरात खाली फेकले जात होते. डोक्यावर व पाठीवर पाण्याच्या जोरदार मारा होत होता. थोड्या वेळातच मी परत काठाकडे आलो. परत धबधबा-परत काठाकडे अशा चारपांच फेऱ्या मारल्या. सारेच आनंदाच्या बेहोशीत होतो. विजयने मला परत धबधब्याखाली जाऊन येण्यास सांगितले. आणि मी त्याची विनंती मानून गेलो सुद्धा. धबधब्याच्या प्रवाहातून वरती चढण्याचा प्रयत्न करु लागलो. परंतु पाण्याचा जोर अेवढा होता की, वर चढणे शक्य होईना. मग मी तो प्रयत्न सोडून दिला. परत काठाकडे यावयास निघालो.

काठापाशी आलो. पाण्यातून बाहेर येण्यासाठी काठावरच्या दगडाला पकडायला हात लांब केला. परंतु दगड गुळगुळीत शेवाळी असल्यामुळे हातात येईना. पुन्हा प्रयत्न केला. परत तोच प्रकार झाला. मग मी दुसरा दगड पकडण्याचा प्रयत्न केला. तो ही दगड हातात येईना. सहजपणे हातात येणारे दगड आज मला आधार देईनासे झाले. पावसामुळे त्यावर चांगली शेवाळी जमली होती. त्यामुळे ते सर्व बुळबुळीत चिकट झाले होते.

अेक दगड हातातून सुटला म्हणून दुसरा दगड, दुसरा सुटला म्हणून तिसरा, तिसरा सुटला म्हणून चवथा, पाचवा, सहावा असे कडेला असलेले दगड आधार देण्यास असमर्थ ठरत होते. आजपर्यंत किती अेक वेळा या ठिकाणी मी भिजण्याचा, या पाण्यात डुंबण्याचा मनमुराद आनंद उपभोगला होता. दगडाला घातलेली पकड कधीही सैल पडली नव्हती, आजचा दिवसच काही निराळा होता **काठावरचे सारे ओळखीचे दगड आज ओळख दाखवेनासे झाले होते.**

पाऊस आणि पाण्याचा जोर वाढतच होता. सारेच दगड हातातून निसटू लागले आणि पाण्याचा वेग मला येऊ लागला. पाणी मला त्याच्याबरोबर नेऊ लागले. मी पाण्याबरोबर वाहू लागलो. काठावरच्या मित्रांना मी याची कल्पना दिली. व पाण्यात न उतरण्याची सूचना केली. दोघेजण काठावरूनच मला मदत करण्यास माझ्या मागे येऊ लागले. परंतु त्या चिकट झालेल्या दगडातून चालणे सुध्दा कठीणच होते. तरीपण त्यांचे प्रयत्न चालूच होते. माझ्या त्या अवस्थेत मी त्यांना धीर देत स्वत:ला सांभाळायला सांगत होतो. व मी स्वत: वाचण्याचा प्रयत्न करीत होतो. सारेच प्रयत्न फोल ठरत होते. पाण्याबरोबर अधिक वेगाने मी वाहू लागलो.

त्या छोट्या तलावाच्या अेका कोपऱ्याला सात-आठ फूट रूंदीचा पाणी वाहण्याचा मार्ग मोकळा होता. त्या दिशेने माझा वाहता प्रवास सुरू झाला होता. मोठ्या धबधब्याच्या पाण्याचा जोर या तळ्यातील पाण्याला आला होता. तो सारा जोर तलावाच्या पाण्यातून या टोकाकडे अेकवटला होता आणि येथूनच दहा-बारा फूटाचा धबधबा पुन्हा खाली पडत होता. त्याचा जोर तर अधिकच जाणवत होता. मी त्या टोकाच्या दिशेने वाहू लागलो. आता आपल्याला कोणीही वाचवू शकणार नाही. जे काही प्रयत्न करावयाचे ते आपले आपल्यालाच करावे लागतील. अशी मनाशी खुणगाठ बांधून, मनाचा तोल ढळू न देता अधिकाधिक प्रयत्नांची पराकाष्ठा चालूच होती.

या टोकाच्या छोट्या धबधब्यातून खाली पडावेच लागणार याची कल्पना येताच मनावर फार मोठा तणाव आला होता. परंतु मनावर कितीही ताण पडला तरी डोके शांत ठेऊन बचावाचा योग्य दिशेने विचार चालू ठेवला होता. माझ्या मित्रांच्याही मनावरचा ताण त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता.

प्रवाहात वाहताना माझ्या लक्षात आले की आपले डोके पुढे आणि पाय मागे आहेत. त्या छोट्या धबधब्यातून पडताना डोके खालच्या दगडावर आपटेल व कदाचित आपण बेशुध्द होऊ व पुढे काही समजणार नाही. पण पायावर पडलो तर पायाला लागेल. फार फार तर पाय मोडेल. असा विचार करून प्रवाहातच मी पाय पुढे केले. काय घडते ते डोळे उघडे ठेऊन पहात होतो. डोके व मन शांत व स्थिर ठेवण्याचाही प्रयत्न चालूच होता. इतक्यात ... इतक्यात मी धबधब्यातून खाली फेकलो गेलो. खालच्या दगडात वरून पडणाऱ्या पाण्याच्या धारेखाली दबून गेलो होतो. वर डोके करून पहाण्याचा प्रयत्न केला. तर भुरकट गढूळ वातावरण नजरेस पडले. आपण वरून पडणाऱ्या धारेखाली अडकलो आहोत याची जाणीव झाली आणि जोरदार प्रयत्न करत त्या धारेखालून वर उसळी घेत बाहेर पडलो. पुन्हा त्या दगडधोंड्यातून खळाळून वाहणाऱ्या पाण्याबरोबर वाहू लागलो. प्रवाहातील दगडातून आधाराचा शोध चालूच होता. येथून पुढे आणखी साठ-सत्तर फूटावर या प्रवाहाचा मोठा पाचशे फुटाचा प्रपात भयंकर आवाज करीत खाली खोल दरीत कोसळत होता. यातून आपण आता वाचू शकत नाही अशी मनाची पक्की खात्री पटली. आणि येणाऱ्या प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी मन घट्ट करू लागलो. मनातल्या या विचारचक्रात व पाण्याच्या प्रवाहात वेडेवाकडे वाहणे चालू असताना पाण्याच्या प्रवाहातील मोठ्या दगडांमध्ये आधाराचा शोध चालूच होता.



धबधबा चालल्या लाटा धबधबा तोच आदळे

मनातील ताणतणाव अधिकच वाढत होते. क्षणा-क्षणाला प्रवाहातून बाहेर पडणे कठीणच होत होते. आशा मावळत चालली होती. पुढचा पाचशे फुटांचा धबधबा डोळ्यासमोर येत होता. तरी सुद्धा मनात अेक आशेचा किरण थोडा थोडा जाणवत होता. त्याच्या जोरावरच सहनशक्तीची कमाल मर्यादा गाठली होती. सारं लक्ष अेकत्रित केंद्रित झाले होते. कसेही करून यातून बाहेर पडणे - बस् ...!

आणि ... आणि अचानक पाण्यातील अेका मोठ्या दगडाला माझा डावा पाय व डावा हात थोडासा तटल्यासारखा वाटला. उजवा हात व पाय पाण्यात पुढे हालत होते. क्षणाचाही अवसर न घालवता डाव्या हाताच्या बोटांची अग्रे (टोके) त्या दगडावर घट्ट रोवली. सारी शक्ति त्या बोटांच्या टोकांमध्ये अेकवटली गेली. डावा पाय खाली जे दगड पाण्यात होते, त्यांच्या मधल्या जागेत जास्तीत जास्त आतमध्ये खोचून ठेवला. आणि काय आश्चर्य ? मी चक त्या मोठ्या दगडापाशी थांबलो अखेर त्या दगडाने मला आधार दिला. मी अेक मोठा श्वास घेत स्वतःला सावरून त्या दगडाच्या आधाराने, त्या खळाळणाऱ्या पाण्यामध्ये उभा राहिलो.

मनावरचा सगळा ताण हळूहळू कमी झाला. अेका मोठ्या प्राण संकटातून आपण वाचलो याची जाणीव समाधान देऊन गेली. मनाची अेकाग्रता कायम होती. त्या खळाळणाऱ्या जीवघेण्या पाण्यात मी उभा राहिलेलो पाहून माझ्या मित्रांना मोठे आश्चर्य वाटले. ते हळूहळू सावरत किनाऱ्यावर माझ्या समोर आले. मी त्या वाहणाऱ्या पाण्याच्या मध्यभागी होतो. तेथून काठावर येणे आवश्यक होते. माझ्या मित्रांना सबुरीचा सल्ला देत पाच मिनिटे शांत राहण्यास सांगितले. नंतर तीन पँटिचे पाय अेकमेकाला चांगले घट्ट बांधून अेक बाजू घट्ट धरून ठेऊन, दुसरी बाजू माझ्याकडे फेकण्यास सांगितले. कारण पाण्याचा जोर प्रचंड वाढलेला होता. सांगितल्याप्रमाणे त्यांनी सर्व तयारी करून अेक टोक माझ्या दिशेने फेकले. दोन-तीन प्रयत्नातच मला मदतीचा आधार मिळाला व त्या आधारावरच फोफावत वहाणाऱ्या पाण्यातून ओढ्याच्या काठावर मी आलो. माझ्या मित्रांनी मला आनंदाने मिठ्या मारल्या. साऱ्यांच्याच डोळ्यातून अश्रु वहात होते. **मीच त्यांचे सांत्वन केले.**

पाण्याच्या प्रवाहातील हा प्रवाही प्रवास जवळ जवळ दीडशे फुटांचा अगदी ऐन दरींच्या उतारावरील खडतर असा झाला. माझ्या मित्रांनीही माझी आशा पूर्णपणे सोडली होती. ते सारेच अत्यंत तणावग्रस्त झाले होते, गोंधळून गेले होते. अेक जण पिंटू थोड्या वरच्या बाजूला अेका भल्यामोठ्या खडकावर उभा होता. माझा हा सारा प्रवास पहात होता. त्याच्या तोंडून शब्दच फुटत नव्हता. मी पाण्यात थांबून उभा राहिलेलो पाहिले आणि त्याच्या मनावरचे दडपण हळूहळू नाहीसे झाले.

माझ्या डाव्या पायाच्या नळीला धबधब्यातून पडल्यामुळे मार बसला व थोडी जखम झाली. परंतु त्या साऱ्या घटनेत मला कांहीच जाणवले नाही. तो भाग बधिर झाला होता. खालून वरती मुख्य रस्त्यावर आल्यानंतर अर्ध्या तासाने जखमेचा भाग चुरचुरायला लागला. तेव्हा

ते समजून आले. इतर कसलाही त्रास वा मानसिक भिती अजिबात जाणवली नाही. माझ्या मित्रानांच मानसिक आधार देण्याचे काम मला करावे लागले. **असा काही बाका प्रसंग आला तर त्यावेळी आपले मनोधैर्य खच्ची होता कामा नये. आलेल्या प्रसंगाला धैर्याने सामोरे गेले पाहिजे, तीच खरी आपली कसोटी असते.**

नेहमी आपण निसर्गाचा शांत, उत्साही व आनंदी वातावरणाचा आणि सौंदर्याचा अनुभव घेतच असतो. पण कधीतरी त्याच निसर्गाचा रौद्ररुपाचाही धैयनि अनुभव घेता आला पाहिजे. तीच खरी आपल्या धैर्यशाली आनंदमयी घटिका असते.

**अरुण श्री. ठाकूर**
अरुण दर्शन, म. गां. मार्ग,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
फोन नं. - २५४२५४४१

•••

दिशा
नियमीत
वाचा

(पृष्ठ क्र. ११वरून)

**श्री राघवेन्द्र स्वामी महाराज जीवन व कार्य**

**प्रकरण पहिले**

**भुवनगिरीला परत**

हंपी उद्धस्त झाल्यावर तिमण्णा यानी भुवनगिरी हे वसतिस्थान केले. मात्र तिथे उपजीविकेचे काही साधन नव्हते. तिथे त्यांची आई, त्यांचा भाऊ व भावजय ही दारिद्र्यात खितपत होती. वेंकण्णाना दारिद्र्याचेच चटके बसले. त्या आपत्तीत भर म्हणजे त्यांना लग्न करावे लागले. ख्रिस्ताब्द १६१४ साली सरस्वतीशी त्यांचा विवाह झाला.

**पुनः कुंभकोणम्**

काही दिवस ती जोडपी सुखाने नांदली व घरची जबाबदारी पण पेलून धरली मोठ्या भावाची परिस्थिती पाहवेना म्हणून कुंभकोणमला जाऊन सुधीन्द्र स्वामींचे - आशीर्वाद घेण्याचे त्यानी ठरविले. वेंकण्णा आलेले पाहून मठातील लोक सुखावले. व मठाचे सदस्य होऊन जाण्याबद्दल विनविले. गुरुजी सतत तीन वर्षे त्याला शास्त्र व तत्त्वज्ञान शिकवित होते. ते सांप्रत प्रवचनासाठी बाहेर जात. त्यांच्या बरोबर हुशार विद्यार्थी असत. ते सुद्धा वेळ प्रसंगी गुरुजीना मदत करीत. व मध्व मताचा प्रचार करीत. वेंकण्णा आले त्या वेळी गुरुजी बाहेर गेले होते. त्या गावी एक अद्वैत वेदान्ती होता. व्याकरणात तो तरबेज होता स्वामीना तो अद्वैततल पटवून देऊ लागला. शेवटी महाभाष्यावर चर्चा करण्याचे ठरले. वेंकण्णा व अद्वैती यांच्यात चर्चा झाली. अद्वैतीने माघार घेतली सुधीन्द्र यांची विद्वता मान्य केली. गुरुजी वेंकण्णावर खूष झाले, त्यांना महाभाष्याचार्य ही पदवी बहाल केली.

(क्रमशः)

**- शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

•••

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा आठवा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## संस्कृति व शिक्षण

भारताचे शैक्षणिक धोरण काय असावे, ह्या तऱ्हेच्या 'दिशाहीन' प्रश्नांची रचना-खरोखर कशी असावी? भारत, (ह्या वैशिष्ट्यपूर्ण) 'राष्ट्रातील' समाजाची, आपल्या 'शिक्षण' ह्या 'जबाबदारीची' जाणीव भारतीय संस्कृतीच्या धारेत स्पष्ट करावयाला हवी व त्या दिशेशी धोरणाची बांधिलकी असावयाला हवी.

मागील दिशाच्या अंकातून ह्या प्रश्नाची पूर्वपीठिका आपण मांडली. ती सारांशाने परत एकदा नजरेखालून घालू या.

## राष्ट्र, समाज संकल्पना

१) प्रथम 'राष्ट्र' ही कल्पना देश किंवा 'नेशन' (Nation) ह्या राजकीय स्वरुपापेक्षा भिन्न व उंच आहे. एका विशिष्ट संस्कृतीच्या ध्येय धोरणाशी व ऋणांशी बांधीलकी मानणाऱ्या समाजाची 'राष्ट्र' ही संकल्पना आहे. ती संस्कृती कांही 'भेळपुरी संस्कृती' नव्हे तर तिची 'बीज-संकल्पना' ही वेगळी आहे व ती 'वेद' ह्या ज्ञान संकल्पनेशी बांधलेली आहे. 'जाति' व 'देश' ह्या दैशिक शास्त्रातील संज्ञेशी आधारभूत आहे.

२) समाज ही एक गतीशील संकल्पना आहे. (Dynamic Concept), कारण तिचे घटक प्रवासी वा जीव हे पृथ्वीवर काही मर्यादित वर्षेच वास्तव्य करतात व त्या घटकांमध्ये प्रत्येक क्षणाला बदल होत असतो. नवीन जीव जन्माला येतात व 'काळ' संपलेले जीव अस्तंगत पावतात. त्यांमुळे पाश्चात्य संस्कृतीतील 'समाज' 'Society' ही कल्पना वैश्विक सत्यावर-व-स्तरावर-तपासून पहावयाला हवी. ह्या 'गतीशील समाजाची (Dynamic Society) **'सांस्कृतिक धारणा'** एका बीजावर आधारलेली असते व तिचे **'वैश्विक सातत्य'** ठेवण्याचे काम 'शिक्षण' या संस्थेच्या संकल्पनेत सामावलेले आहे. त्याची स्पष्ट जाणीव समाजाला व राज्यकर्त्यांना बिलकूल नाही, ही सत्यस्थिती आहे - **'तात्कालिक व भौतिक उद्दिष्टांपूरती** ही संकल्पना मर्यादित नाही. पण 'भौतिकवादी' समाज वा राज्यकर्त्यांनी ह्या 'सीमित संकल्पनेवरतीच बहुतांशी ही 'शिक्षणसंस्था ही संकल्पना' बांधून ठेवली आहे. तिची **वैश्विक संस्कृती (Cosmic Culture) व सत्यता (Reality)** ही एक नकळत व अजाणतेपणे राबवलेली 'भ्रामिक' (Confused) अशा तऱ्हेची जबाबदारी दिसते आहे.

## ज्ञानाची भूमिका

३) मग 'ज्ञान' म्हणजे काय? हे ज्ञान कुणासाठी, कशासाठी? ह्या ज्ञानामुळे 'मानवी संस्कृतीची' कुठली जबाबदारी संभाळली जाते आणि वृद्धिंगत होते ? ह्या व अश्या संलग्न प्रश्नांची उत्तरे मिळवायला हवीत.

## मटेरिॲलिस्ट एपिस्टेमॉलॉजी

ज्ञान, ज्ञानाची साधने, ज्ञानाचा उद्देश ह्याबद्दल प्रचलित असलेल्या संकल्पना ह्या सध्याच्या भौतिकवादी ज्ञानशास्त्र (Epestemology), भौतिकवादी संस्कृती,

उपयुक्ततावाद, भौतिकवादी जीवन व तत्त्वज्ञान, राजकारण शास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र ह्या चौकटीत बांधलेल्या आहेत. सध्याच्या शिक्षणसंस्था सुद्धा ह्या दृष्टिकोनाशी बांधून घेतलेल्या आहेत व ह्या पृथ्वीवर जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाचा ताबा बाल्यावस्थेतच घेऊन, ह्या जीवांचा विश्वास, एका 'हेच ज्ञान' परिपूर्ण आहे व ह्याबाहेर कांही ज्ञान नाही, किंवा ह्या ज्ञानाच्या पद्धतीखेरीज इतर पद्धती ह्या 'शास्त्रीय' नाहीत 'विश्वासार्ह' नाहीत, अश्या संकल्पनावर आंधळा विश्वास लादणाऱ्या - अश्या शिक्षणसंस्थाच एका राजकीय व आर्थिक आधारावर जिवंत ठेवण्यात आल्या आहेत.

**वैदिक संकल्पना**

ह्या पेक्षा अगदी निराळी संकल्पना वैदिक बीजावर आधारलेला भारतीय संस्कृतीत आहे. त्यावर आपण पुढे विचार करणार आहोतच. पण, त्या अगोदर ह्या पाश्चात्य संस्कृतीवर आधारलेला समाजाची 'प्रगती' काय होते आहे व त्या प्रगतीची **'मौलिक पत व मूल्ये'** काय आहेत व ही प्रगती आहे की अधोगती आहे - तिचे जीवनाच्या वैश्विक हेतूशी किती साधर्म्य आहे, याचा विचार करु या! ह्याचे कारण हेच की 'प्राणीजीवनाच्या चौकटीतच' वावरणाऱ्या ह्या **''भौतिकवादी संस्कृतीची''** तुलना ''दैवी, विश्वधर्मी व आदर्श जीवनधर्माशी'' होत नाही. त्यामुळे तुलनात्मक गुणवत्तेचा आढावा घेण्याची संधीच समाजाला मिळू नये असा ह्या संस्कृतीत Vested Interest 'मतलबी हेतू' असणारा वर्ग-एक 'कट' करुन बसलेला आहे. ह्या 'कटाची जाणीव' उलगडा होण्यालाही फार मोठे प्रयत्न व तपस्या करावी लागणार आहे. खोट्या व तोकड्या व 'प्राणी जीवनाला सदृश्य' अशा ज्ञानाच्या व शिक्षणाच्या 'भूलभूलैय्यातून' समाजाला वाचवावे लागणार आहे. ह्या शिक्षणसंस्था समाजावर एक विशिष्ट विचारांचे 'Conditioning' व 'Regimentation' करीत आहेत. या चौकटीतून 'Paradigm पॅरडिम' मधून बाहेर पडण्यास जो प्रयत्न करावा लागतो, त्याची जाणीव व सुरवात होण्यापूर्वीस या जीवांची आयुमर्यादा संपून जात आहे.

प्रथम प्रचलित समाजव्यवस्था ज्या संस्कृतीवर व तत्त्वज्ञानावर भिस्त ठेवून आहे तिचे खरे स्वरुप व त्यातील दोष आणि **'वाळूच्या किल्ल्यावर आधारलेल्या संकल्पना'** तपासून बघू या. अर्थात ह्या छोट्याशा लेखात त्याचा विस्ताराने विचार करणे शक्य नाही म्हणून केवळ सूत्र रुपाने मी हे मुद्दे मांडणार आहे.

ह्या सबंध विश्वाचा संकल्प व रचना ह्याबद्दल प्रचंड वाद आहे. पण भौतिकवाद्यांनी ख्रिश्चन व इस्लाम या 'सेमेटिक' धर्मांच्या 'विश्वनिर्मितीच्या (Creation) संकल्पना ह्या कश्या चुकीच्या व अंधश्रद्धेवर आधारलेल्या आहेत हे आपल्या 'भौतिकवादी विज्ञान' म्हणजे **'फिजीक्स व मॅथमॅटिक्स'** ह्या तर्कपद्धतीच्या जोरावर 'सिद्ध' केले व त्याच्या प्रतिक्रियेत भौतिकवादी समाजपद्धती व राज्यपद्धती व जीवनव्यवहाराची मांडणी केली. पण, **वैदिक विश्वसंकल्पनेचा** बिलकुल आढावा, अभ्यास व पराभव केला नाही. त्यामुळे **Scientific 'Materialism'** **'शास्त्रीय भौतिकवाद'** हा सिद्धांत न तपासताच - - समाजरचना व शिक्षणपद्धतीत पायाभूत समजण्यात आला.

**''Progress and utility''**

आजचा समाज १९ व्या शतकातील 'प्रगती व उपयुक्तता' ह्या व्यावहारिक **'स्वप्नाळू मोहवादी कथेच्या स्वरुपाच्या'** संकल्पनेवर विश्वास ठेवून आहे. ही 'प्रगती' एका भौतिक वर्तुळाकृती कुंपनातच व्यक्त होत आहे. तिचे वर्णन **'Pragmatic Positivism'** **'व्यावहारिक सकारिता, सत्यता'** ह्या शब्दात होऊ शकेल. ह्या विश्वाच्या मुळाशी न जातां, ह्या जीवनाच्या हेतूच्या व सृष्टीच्या हेतूशी न जातां फक्त 'प्राणी दृष्टीमध्ये'

सामावलेल्या भोगजीवनापुरतांच विचार 'व्यावहारिक' होय; आणि त्यांत वैश्विक रचनेमधल्या भोग समृद्धि, तंत्रसमृद्धी (Technology) व लालित्याची पाठपुरवणी म्हणजेच 'प्रगती' होय. 'अभ्युदय' हे सत्य व **'निःश्रेयस' सुख** ह्या केवळ थापा होत, असा विश्वास निर्माण करणाऱ्या शिक्षणसंस्था भरभराटीस आल्या. जीवनातील जन्म, मृत्यू व "मी कोण" ह्या संकल्पनेच्या शोधाकडे पाठ फिरवणाऱ्या व पळपुट्या 'नैतिक मूल्यशून्य' व (Escapist) अश्या ज्ञानाचा प्रचार करूं लागल्या. तसेंच ह्या विश्वात 'सत्य' Eternal व ऋत (विश्वधर्म कायदा) ह्या 'कविकल्पनेंच्या' पाठीमागे न लागता 'इंद्रियांना त्यांच्या प्राथमिक, मर्यादित व दोषयुक्त दृष्टित भावणाऱ्या संकल्पनेच्या बाहेर पडण्याचा बिलकूल प्रयत्न न करणाऱ्या ज्ञानाच्या 'फोफट पसाऱ्यालाच' प्रगती मानणाऱ्या संस्था, राज्यसंस्थांचा व शिक्षणसंस्थांचा ताबा बळकावून बसल्या. ह्या भौतिकवादी दृष्टिकोनात ह्या जगात जी कांही अशांतता, अस्थैर्य, संघर्ष संहार व जीवनमूल्याचा ऱ्हास व माकड चेष्टा (Monkey Tricks) व भोंदू योजना चालल्या आहेत, त्याचा पडताळा आपल्याला रोज येतो आहे. त्यामुळे, समाजाची 'मौलिक सुधारणा' 'ही' प्रचलित संस्कृती व तत्त्वज्ञान करूं शकेल ह्याची सुतराम अपेक्षा ठेवतां येणार नाही. त्याचे कारण मूलगामी बदल हा 'कॉंशसनेस' व मानवी प्रवृत्ती ह्यामधील सात्त्विक पातळीवर नेणारा बदल होय. पण, 'हे भौतिक' तत्त्वज्ञान हे सत्य मानत नाही. ही प्रगती केवळ **'वैचित्र्यात दर्शनी वाढ'** व **'गुंतागुंतीत आणखी गुंता'** ह्याला प्रगती व बौद्धिक प्रगती मानते. ह्या विचारधारेत थोडी विश्रांती घेऊन ह्या भौतिक तत्त्वज्ञानातील **'सत्य' जोखणाऱ्या** यंत्रणेचा विचार तपासू या.

## रंगी शिंगी जोडी


Physics व Maths पदार्थविज्ञान व गणित ह्या मानवीनिर्मीत तर्कपद्धतीत ही जीवनपद्धती गेली जवळजवळ ५०० वर्षे पूर्ण विश्वास ठेवून आहे. इतर 'प्रमाणे', व मोजमापाच्या पद्धतींना (Proofs, measurements) तडीपार करण्यात आले आहे. त्यामुळे, ह्या विश्वाच्या 'अनाकलनीय' 'अनिर्वचनीय' निसर्गतत्त्वांचा व धर्माचा पत्ता नसल्याने व 'अनादर' असल्याने 'ही रंगी-शिंगी जोडी' आपल्यातच एकमेकाला सत्यज्ञानाची सर्टिफिकेट्स देण्यात धन्यता मानत आहे !! **'अहो रुपम् अहो ध्वनी'. उंट सुंदर व गाढवाचा आवाज मधुर** ह्या परस्पर, स्तुतीवर आधारित वर्तन !!

## निधर्मी ज्ञानशास्त्र

सोबत 'Secular Epistemology' 'निधर्मी ज्ञानशास्त्र' हे चित्र पहा. गणितात व पदार्थविज्ञानांत जी प्रगती झाली त्याचा आढावा व परस्पर 'रंगी - शिंगी' नाते दाखवले आहे. न्यूटनच्या शोधांचा आधार हा 'डिफरन्शल कॅलक्यूलस' ह्या गणितातील संशोधनावर वा तत्त्वांवर आधारलेला आहे. त्याचा जो गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत जगप्रसिद्ध आहे व शाळा कॉलेजमध्ये आपल्याला शिकावा लागला, त्याबद्दल त्यांच्याच भौतिकवादी विज्ञान पद्धतीमधल्या शास्त्रज्ञांनी घेतलेल्या शंकाचे वर्णन शब्दांकन चित्र नं. २ मध्ये दाखविले आहे. यातील एकही शब्द माझा नाही.

Evolutionary Mathematics

| Theory in Physics | Theory in Mathematics |
|---|---|
| 1. Newton's Mechanics | Differential Calculus |
| 2. Maxwell's Electrodynamic | Vector Analysis |
| 3. Quantum mechanics | Functional Analysis |
| | Geometry of Hilbert Space |
| | Group Theory |
| 4. General Relativity | Tensor Calculus |
| 5. Themodynamics and Statistical Mechanics | Theory of Probability and Stochastic Processes |




चित्र नं. १ सेक्यूलर एपिस्टेमॉलॉजी

Watch
For.....

- Newton's theory of gravity does not explain *why* objects attract one another, it simply models this observation.
- There is no known power source supporting the gravitational field that Newton claims to be emanating from our planet and from all objects.
- Despite the on going energy expended by Earth's gravity to hold objects down and the moon in orbit, this energy never diminishes in strength or drains a power source - in violation of one of our most fundamental laws of physics: the *Law of Conservation of Energy.*
- These mysteries and violations are overlooked today because of a flawed explanation that arises from the improper use of an equation known as the *Work Function.*
- Every effect explained by Newton's theory of gravity today is accurately modeled by *non-gravitational* equations that existed even before Newton.
- Newton's gravitational force is actually an entirely redundant and superfluous concept providing no additional usefulness and having no proven existence in nature or scientific support.

चित्र नं. २ न्यूटनचा लॉ ऑफ ग्रॅव्हिटी

## एकांगी जिज्ञासा

झाडावरुन सफरचंद खाली पडले ह्याचे कारण पृथ्वी फळाला खाली ओढते व तसा 'जोर' 'Physical Force' उत्पन्न करते. त्या फळाचा वेग व गतिवृद्धि Speed, Accderation कसे होते त्याची मोजदाद आपल्याला 'विश्वनियम' म्हणून शिकवण्यात येत होती.

पण, हे फळ कां निर्माण होते व जमीनीवर पडल्यावर त्यातच असलेल्या बीजपासून पुन्हा वृक्ष कां निर्माण होतो व

Godel's incompleteness theorem constructs a process, and it shows that all mathematical systems which are invented by men who have arbitrarily chosen a few finite number of axioms and mathematical reasoning rules will always come alive and puke up at least one mathematical statement which is beyond the comprehension of its inventors. In short, the fire of God's spirit will always burn a hole on every mathematical system invented by men. This process is a ball-donut transformation.

चित्र नं. ३ गॉडेल्स थियरम

त्याला पुन्हा असेंच **'पूर्ण जीवन संकल्पना'** सामावलेले फळ कां निर्माण होते हे सांगण्याची जबाबदारी गणितावर नव्हे तर 'बायॉलॉजी व जीनस्' ह्या शास्त्रीय दालनात जावे लागेल. इथे 'One Window' असे शास्त्र नाही. एका टेबलावरुन दूसऱ्या टेबलाकडे फेकणाऱ्या फाईलीची व्यवस्था आपण भोगतोच आहोत तर्सेच ज्या 'प्रुफ' प्रमाणावर आपण भिस्त ठेवून आहोत त्याच गतीत ह्या मानवबुद्धी निर्मित पद्धतीवर ! '**Godel's incomplete theorem**' काय म्हणतो ते चित्र नं. ३ मध्ये वाचा.

## गोल चेंडूचे दो नट रुपांतर-गॉडेल

"गॉडेलचा अपूर्णतेचा सिद्धान्त एक पद्धति - कार्यप्रक्रिया प्रदान करते. मानवनिर्मित गणीती पद्धतीमध्ये अतार्किक पद्धतीने-स्वेच्छाचारी पद्धतीने ज्या संख्या (कृत्रिम) व गृहित तत्त्वे गणीती तर्कशास्त्रावर व नियमावर निवडण्यात आल्या त्या नेहमीच जिवंत व जागृत होऊन एखाद्या तरी गणीती विधानांतील भसकन एखादे छिद्र दाखवतीलच ! ज्यामुळे ह्या सिद्धातांच्या संशोधकाची बुद्धी मर्यादा विशद होईल. थोडक्यात, ईश्वरी सत्ता प्रत्येक गणीती सिद्धान्तामध्ये मोठे भोक पाडील व दर्शवील ! ह्या क्रियेला "गोल चेंडूचे दोनट रुपांतर असे म्हणतात. (Ball-Donut Transformation)."

### शास्त्रीय नियम मानव निर्मित की ईश्वर निर्मित


ह्या मानवी बुद्धीला अहंकाराने ग्रासले आहे. खरोखर हे 'ॲपल फळ' हजारो युगे जमीनीकडेच आकृष्ट होत आले आहे. पण, ह्या क्रियेला नैसर्गिक, ईश्वरनिर्मीत मानण्यात मानवी बुद्धीला कमीपणा वाटतो. त्यामुळे हे फळ 'Newton's Law of Gravity' म्हणजे ऐझॅक न्यूटनच्या सिद्धांताला मान देऊन मुकाटपणे न्यूटनने सांगितलेल्या गती नियमाप्रमाणे पृथ्वीवर पडते. तसेच सर्व ग्रह, तारे मुकाट्याने न्यूटनच्या सिद्धान्ताला मान तुकवून अखंड नेड्यासारखे व गुलामासारखे भरकटत रहातात.

मूर्तीपूजेचे रहस्य न समजल्याने त्याला अंध विश्वास संबोधणारे हे शास्त्रज्ञ (?) न्यूटनची एक मूर्ती पुण्याच्या सायन्स इंस्टिट्यूटमध्ये बांधतात. ही विसंगती नव्हे कां ? या यंत्रवत गतीखेरीज ह्या निर्बुद्धांना काही तरणोपायच नाही-नाही कां ?

मला विनोदाने एक आठवण सांगाविशी वाटते. (मध्य रेल्वे) शहाड स्थानकावरील गाजलेले **'बिर्लामंदिर'** मी पहावयाला गेलो तेव्हां मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण, गाभाऱ्यात **'घनश्याम बिर्लांची'** मूर्ती असणार अश्या अपेक्षेने गेलेल्या मला, त्याऐवजी विठ्ठलाची मूर्ती पहावयाला लागली. हे कुठले 'दर्शन' कोणाचे मंदिर ? उलट, आमच्या ऋषी मुनींनी 'वेद ऋचा मधील ज्ञान सांगताना' हे केवळ-दर्शन व ज्ञान-'अपौरुषेय' असे विनम्रपणे व सत्य सांगितले. केव्हढा हा विरोधाभास !!

आमच्या भारतीय संस्कृतीतील 'ब्रह्म' ह्या संकल्पनेची Metaphysics, Mysticism, Mythic अशी संभावना करणाऱ्या पाश्चात्य भौतिक संस्कृतीतील वैज्ञानिकांनी "Theory of Everything". ह्या संकल्पनेचा ध्यास घेतला आहे. चित्र नं. ४ (Fig. 1.1) "Patchwork of Theories Today vs Theory of Everything". ह्या चित्रांत डाव्या बाजूच्या चौकोनात "Standard Theory" म्हणजे आज ज्या भौतिक 'शास्त्रीय पद्धतींना ज्ञानशास्त्रांत मानाची जागा दिली आहे. त्यांना **'विस्कळित'** असे संबोधून "Theory of Everything" ह्या उजव्या बाजूच्या चौकटीत एका 'Single Principle' च्या प्रभावात इलेक्ट्रिक, मॅगनेटिझम (चुंबकत्त्व), Gravity, Electro Magnetic Radiation, Electricity, Subatomic Particles ह्यामध्ये सुसंबद्धता व बांधणी अपेक्षित केली आहे.

मला, सॉलिसिटर नेहमी एक **'सेव्हिंग क्लॉज'** आपल्या **'प्लेंट'** मध्ये किंवा ॲफिटेविट मध्ये घालतात.




चित्र नं. ४ थिअरी ऑफ एव्हरीथिंग

ती आठवण आली. 'एका पॅरेग्रॅफ मधील विधान दूसऱ्या पॅरेग्रॅफमधील विधानांशी विरोधात दिसले तरी खटल्यातील सत्यतेला बाध मानू नये.' अशी अवस्था ह्या भौतिक शास्त्रांची आहे.

**मानवी अहंकार**

मी ही थोडी कठोर टीका करतो आहे ती हेतुपुरस्पर आहे. कारण, फार मोठी 'गफलत' आपल्या ज्ञान पद्धतींत आली आहे. आपल्यासारख्या मानवी मर्त्य व क्षुद्र अस्तित्वाला एक विशिष्ट 'Individuality' 'व्यष्टित्वं, 'व्यक्तित्वं', 'नाम' हे या पृथ्वीवर प्राप्त होते. त्याला (अहं) कार असे संबोधण्यात येते. पण ह्याचा इंग्रजी अविर्भाव जो 'Ego' ह्या शब्दात होतो, त्याचा व्यावहारिक अर्थ 'अभिमान', 'गर्व' असा जास्त प्रमाणात होतो. आता ह्या मनुष्यदेहाच्या सीमित बुद्धीने ज्या ज्ञानाला 'सत्यज्ञान', चिरंतन ज्ञान ह्याचा ध्यास युगेनियुगे लागला आहे - आणि तो योग्य व साहजिकच आहे. त्याला 'आधुनिक भौतिकवादी विज्ञान' एका 'संकुचित चौकटीत (फ्रेम) अडकवून टाकते आहे व त्याला 'रंगी नि शिंगी' 'Physics and Maths' हे खोटे, फसवे 'सर्टिफिकेट' देत आहेत. गणीत हे काही 'जडातीत' ''beyond matter'' असे तर्कशास्त्र नाही तर ते 'Relative Knowledge' परस्परावलंबित व गृहीते अश्या भौतिकत्त्वात अडकलेले मानवनिर्मीत व मानवाच्या सीमित ज्ञानबंधनात अडकलेले शास्त्र आहे. त्याच्या पुराव्यावर 'सत्यज्ञानाची' 'ॲसिड टेस्ट' - सुवर्णाचा कस लागणारी परीक्षा होऊ शकत नाही. हे तर भौतिक 'मायाजाल' वा 'भ्रमशास्त्र' आहे. ''True Reality is beyond Relative Knowledge'' ऋत व सत्य, **त्रिकालाबाधित ज्ञान हे 'तुलनात्मक ज्ञानाला'** अशक्य आहे.

**भौतिकतेचा चंद्रविजय**

इथे भौतिकवादी धावून येतील व प्रश्न विचारतील कीं ह्या ज्ञानाच्या जोरावर ज्या अनेक किमया भौतिकवादी विज्ञानाने करुन दाखवल्या त्या ही **'सत्यज्ञानाची परीक्षा'** पास झाल्याचेच दर्शवित नाहीत कां ? उदाहरणार्थ, 'चंद्रावर मानवाचे पाऊल' किंवा जेनेटिकल-लिंग बदल' किंवा 'ओपन हार्ट सर्जरी' वगैरे वगैरे हा **निसर्ग विजय** आहे कां ? परिपूर्ण आहे कां ? सत्यज्ञानाचा आहे कां ?

तर त्याला उत्तर हेंच कीं एका मर्यादित अस्तित्वात हे 'विजयाचा आभास' करण्यात यशस्वी होतात पण 'पूर्ण सत्यापासून' ते वंचितच रहातात. उदाहरणार्थ चंद्रावर मानवाचे पाऊल पडले हे स्पृहणीय भौतिक यश आहे पण सूर्यापासून शक्ति आणि प्रकाश मिळवून पृथ्वीला ह्या शक्ति व प्रकाशाला परावर्तित करणारा चंद्र कुठला **'इंटलिजंट डिझाईन'** ''Intelligent design'' ने अस्तित्वात आला ? कोणी हे 'डिझाईन' केले कां बरे त्याचा समुद्राचा भरती ओहोटीवर, पृथ्वीवरील जीवांच्या रम्यकप्रवाहावर, मानसिक संतुलनावर, वनस्पती जीवनावर प्रभाव पडतो - भौतिक, फिजिकल, सायकिक व स्पिरीच्यूअल क्षेत्रात ! चंद्राची कुठली १७ वी कला ज्ञानदेव महाराज सांगत आहेत ? हा काय कुठल्या 'ग्रॅव्हिटी फोर्सचा' प्रताप आहे ? हे व असे प्रश्न विज्ञानाच्या 'अजेंडावर' कां दिसत नाहीत ? त्यांच्या ज्ञानशास्त्राच्या पद्धतित व साधनात ही उत्तरे मिळवण्याची क्षमता आहे कां ?

ह्या विश्वाच्या निर्मितीत व निसर्गाच्या आंखीव वर्तनात काही मूलभूत विचारधारा व योजना दिसते कां व ह्या रचनेच्या मागे एखादा विशेष बुद्धीमान 'निर्माता' असण्याची शक्यता आहे कां ? या प्रकारचा प्रश्न पाश्चात्य जगात जोराने चालू आहे. एका बाजूला या तऱ्हेची जिज्ञासा व मांडणी ही देखील विज्ञानाच्या प्रांतात उद्भवायला हवी व असे शिक्षण शाळा, कॉलेज, युनिव्हर्सिटीमध्ये विज्ञान-सायन्सच्या विषयांत अंतर्भूत असावयाला पाहिजे असा एक मोठा पालकांचा, विद्यार्थ्यांचा गट हे प्रश्न उपस्थित करतो आहे तर दूसऱ्या बाजूला हा सायन्सचा विषय नाही

- ईश्वराची कल्पना विज्ञानांत घुसडण्याचा हा 'धार्मिक कावा' आहे असे शिक्षणाधिकारी व प्रोफेसर्स म्हणत आहेत. हा प्रश्न सध्या न्यायालयात दाखल झाला आहे. त्याला 'Dispute about Intelligent Design' असे म्हणत आहेत.

**डार्विनची 'ब्लॅक बॉक्स'**

या वादाची सुरवात Michael J. Behe ह्यांच्या 'Darwin's Black Box' (1996) ह्या वादग्रस्त पण प्रसिद्ध पुस्तकावरुन झाली - नजीकच्या काळात - असे म्हणावयाला हरकत नाही. ''Darwin's Black Box' has made a **strong and controversial** Statement about the inability of mutation and selection to produce. ''**irreducible complexity.**''

**ज्ञान पद्धतीतील सांस्कृतिक भेद**

ह्या वैचारिक व तात्विक संघर्षाचा किस्सा सांगणाऱ्या हेतू इतकाच कीं दोन संस्कृती, त्यांच्या ज्ञानपद्धती, जिज्ञासांमधील फरक व त्यांची पूर्वग्रही व बंदिस्त विचारसरणीचा थोडा परिचय व्हावा.

''डार्विनच्या Evolution ह्या सिद्धान्ताचा अर्थ म्हणजे चैतन्याची व पदार्थाची पृथ्वीवर किंवा इतरत्र 'उत्क्रांति,' ही, 'म्यूटेशन' व 'सिलेक्शन' सारख्या 'यंत्रवत लॉ' (कायदा, नियम) ह्याने होते, त्यांत इश्वर किंवा तत्सम दैवी शक्ती, इच्छाशक्ती, ज्ञानशक्ति व क्रियाशक्तीचा हात संभवण्याचे काहीच कारण नाही.'' त्यांचे पुढे असे म्हणणे आहे कीं हा ख्रिश्चन मिशनरी व चर्च ह्यांचा जीझस ख्राइस्ट व इतर संत ह्यांच्या धार्मिक संकल्पना 'शुद्ध वैज्ञानिक शिक्षणांत' मागल्या दाराने घुसवण्याचा डाव आहे. आम्ही हे 'शुद्ध तत्वज्ञान' materialist science (भौतिकवादी विज्ञान) 'भ्रष्ट' होऊ देणार नाही. इथे, थोडे अतीक्रमण करुन म्हणावेसे वाटते कीं वैदिक विश्वनिर्मीतीची संकल्पना "Vedic creation therory of the universe" याचा पुसटसाही परिचय वा ज्ञान ह्या वादी, प्रतिवादी व न्यायसंस्थेला नाही ही दुर्दैवाची बाब आहे. त्यामुळे 'ख्रिश्चन धार्मिक थिअरीचा' पराभव न्यूटन, गॅलीलियो वगैरे मंडळींनी केलाच आहे त्याचीच पुनरावृत्ती अपेक्षित आहे. पण, मूळ प्रश्नाला बगल देऊन कमअस्सल प्रतिस्पर्धी पटांगणात कोर्टयार्डात आणून विज्ञानधार्जिणे आपला डेमॉक्रॅटिक बनावट विजय संपादू इच्छितात एव्हढेच !!

**सांस्कृतिक संघर्ष**

आपला मुख्य वाद हा आहे कीं 'ज्ञान' हे फक्त पृथ्वीवरील मानवाच्या संकुचित भोगवादी व उपयुक्ततावादी दृष्टीकोनाला बांधून ठेवावयाचे की ज्ञानाची कालातीत, देहातीत व बंधनरहित अशी व्याख्या व संकल्पना आणून घ्यावयाची आहे ? भारतीय संस्कृतीत वैदिक ज्ञानाच्या आधारावर एक 'ऋत' व 'सत्य' ज्ञानाची कास 'ज्ञेय' चीज म्हणून मानण्यात आली आहे. मी मर्त्य असेन, समाजातील घटकही पृथ्वीवरील अस्तित्वात मर्त्य अवस्थेत वर्णनातच बसतील. तरीही ''मी'' म्हणजे देह फक्त नसून ह्या अस्तित्वाच्या पलीकडील अमरत्व असलेली एक चीज आहे. हे अमरत्व जाणण्याची व प्राप्त करण्याची 'माझी' इर्षा आहे. त्यामध्ये माझ्या 'Embodied Consciousness' बंदिस्त चैतन्याला ज्या भ्रमात अडकवलेले दिसते, त्याच्या चित्त व प्रवृत्ती मध्ये जे दोष आढळतात, त्याच्यापासूनही मला मुक्त व्हावयाचे आहे. माझ्या आकलन शक्तीला 'मेधा' व 'प्रज्ञा' यांच्या दैवी शक्तींच्या मदतीने सामर्थ्यवान करावयाचे आहे. मी जो अनेक 'भौतिक पाशात' अडकलेला दिसतो आहे तो 'पशुपती' ह्या शक्तीच्या सहाय्याने मुक्त व्हावयाचे आहे. मला जी पशूवत-बद्ध-पशुतुल्य 'दृष्टि' जन्मत: मिळाली आहे - तिच्यापेक्षा 'साक्षात्कारी दृष्टि' व ज्ञान मिळवायचे आहे. व नंतर माझ्या अस्तित्वाला 'अमरत्त्वाचे स्थान' मिळवून द्यावयाचे आहे.

असतो मा सत् गमय ।
तमसो मा ज्योतिर्गमय ।
मृत्योर्मा अमृतम् गमय ।

ही माझी जीवन घोषणा आहे. मी 'Lord of Death' 'यम' - ह्याच्याशीही माझ्या 'नचिकेत' ह्या मानवी प्रातिनिधिक- 'कॉंशसनेस' -चैतन्यातून-वाद घातला आहे. (कठोपोनिषद) !! 'सावित्रीच्या भूमिकेतही' हाच लढा व दिशा अनुस्यूत आहे. (Mahayogi Aurobindo Ghosh) पण ह्या सर्व लढ्यात मला ह्या दिव्य ज्ञानाला पात्र होण्यासाठी तपस्या करावी लागणार आहे. जन्मजन्मांतरीच्या लढ्यातून - मानवी समाजातील ह्याच समस्यांच्या घटकांच्या 'सामुहीक लढ्यातून' हे यश मिळवावयाचे आहे. तटस्थ वाटणारे इतर मर्त्य घटक म्हणजे प्राणी जीवन व निर्जीव घटक हेही माझ्यावरोबर ह्या लढ्यात सहभागी आहेत. त्यांचीही मदत मला होत आहे - होणार आहे. ह्या डायनॅमिक समाजालाही एक 'आत्मा' आहे व त्याच्या कालातीत प्रवाहात हे ध्येय, उद्दिष्ट प्राप्त होणार आहे. म्हणूनच मी 'अमरपुत्र' आहे. म्हणूनंच हा माझा दिव्य जीवन 'Divine Life' चा 'लढा' आहे. म्हणूनच मी 'क्षत्रिय' सुध्दा आहे. म्हणूनच मला 'गीतेचा' उपदेश प्राप्त झाला आहे. विश्व हेच माझे कुरुक्षेत्र, धर्मक्षेत्र वगैरे आहे.

**पाश्चात्य गोंधळ**

पाश्चात्य संस्कृतीत ह्या तुलनेने वैचारिक गोंधळ माजला आहे. ज्ञानाच्या दिशाहीन, ध्येयहीन भूमिका मांडण्यात येत आहेत. पृथ्वीवरच्या तात्कालिक अस्तित्वाच्या तोटक्या संदर्भात हा 'वैश्विक लढा' बघितला जातो आहे व त्याचे 'प्राणी जीवनालाच शोभेल' - प्राणीजीवाच्या दृष्टीला झेपेल असे तत्त्वज्ञान मांडण्यात येत आहे हे आहे भौतिकवादी व व्यवहारवादी - Materialist and pragmatist धोरण हा आहे या संस्कृतीच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनाचा सारांश !! ह्या संकुचित, अज्ञानी दृष्टीकोनाला बुद्धीच्या मायावी अविष्कारात व खेळात मूळ दैवी ध्येयाला बगल देण्यात येत आहे. मानवी बुद्धीच्या मर्यादा, दोष ह्याकडे लक्ष देण्यात येत नाही आहे.

त्यामुळे, अश्या संकुचित दृष्टिकोनाला बांधलेली लिलिपुटीयन (Gulliver's Travels) बुटक्या माणसांच्या बुद्धीला शोभेल अश्या शिक्षणसंस्थातून 'प्रत्येक जीवाला' कंडिशनिंग, रेजिमेंटशेन करुन ह्या उत्तुंग व विजीगिषू ध्येयाला बाध व अडथळा निर्माण करण्यात येतो आहे. ह्याचे गोंडस नांव 'सांस्कृतिक संघर्ष' असे ठेवण्यात आले आहे. Cultural conflict हे त्याचे प्रो. हटिंग्टन ह्यांनी नामकरण केले आहे. त्यामुळे, जोपर्यंत आपण आपल्या भारतीय संस्कृतीच्या उच्च ध्येय धोरणाला जाणत नाही - पुनरुज्जीवित करीत नाही जोपर्यंत आपण ह्या 'शिक्षण संस्था' ह्या खऱ्या ध्येयांना बांधून प्रगत करत नाही, तोपर्यंत आपण ही जबाबदारी टाळत आहोत असेच म्हणावे लागेल.

तेव्हां, ह्या पुढच्या लेखांत ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आपल्या 'सनातन संस्कृतीने' कोणती सामुग्री, ह्या क्षणापर्यंत, आणून ठेवली आहे ते बघू या. आमच्या ऋषी, मुनींनी निसर्गाचा, विश्वाचा, मानवी जीवनाच्या ह्या प्रगतीसाठी कोणता मार्ग आखला आहे. तो जाणण्याचा प्रयत्न करु या. मानवी बुद्धीच्या आवाक्यात ही 'दिशा' आणण्यासाठी कुठचे प्रयत्न करावयाला हवे याचा साकल्याने विचार पुढल्या लेखांत करु या.

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट
अग्यारी लेन, ठाणे - ४००६०१.
टे. नं. २५३६८४५०
E-mail : yrsane@eth.net
Mbl : 9892046539

# परिसरातील झाडे - अशोक

*डॉ. मोझेस कोलेट यांनी ज्ञानद्वीप परिसरातील झाडांवर शास्त्रीय व सामान्यांना माहीत असावी अशा माहितीची लेखमाला लिहावयास घेतली आहे, त्यातील हा पहिला अनुवादित लेख - संपादक*

अभिजात इंग्रजीत अशोकाला 'मास्ट ट्री' असे नाव आहे. पण हे अशोकाचे झाड रामायणातील अशोकवनात सीता ज्या अशोकाखाली बसून शोक करीत होती ते सीता अशोक (पा सॅराका इंडिका) नाही. त्यामुळेच अनेकदा या अशोकाच्या झाडाचा 'खोटा अशोक' असा इंग्रजीत उल्लेख आढळतो.

वानसशास्त्रीय नाव - पॉलिॲलिथिया लाँगीफेलिया
कुळ - अनोनॅसिआ
इंग्रजी नाव - मास्ट ट्री, इंडियन फर, खोटा अशोक

**भारतीय नावे**

हिंदी - अशोक (देवदार), असोपालव, आसुपाला
बंगाली - देवदारु
मल्याळाम् - कोसना
मराठी - अशोक

उत्तरभारतात देवदार तर दक्षिण भारतात अशोक म्हणून ओळख वानसशास्त्रीय नाव पॅलिथिया हे ग्रीक भाषेतून आले आहे. पॉली म्हणजे पुष्कळ. अल्थिया हे नाव मूळ अल्थायनो वरुन आले आहे. त्याचा अर्थ बरे करणे किंवा करुन देणे असा आहे. म्हणजेच पुष्कळ बरे करणारे असा अर्थ अभिप्रेत आहे. प्राचीन काळी या झाडातील औषधी गुणधर्म माहीत होते असा हा संदर्भ आहे. लॉंगिफेलिया या लॅटिन नावाचा अर्थ आहे लांब (आकाराची) पाने. इंग्रजीतील मास्ट हिचा संदर्भ प्राचीन काळातील जहाजांशी आहे. शिडांच्या डोलकाठी साठी झाडाचा उंच असा बुंधा वापरला जाई.

अशोकाचे झाड मूळ भारताच्या दक्षिण प्रदेश, श्रीलंका व बंगाल मधील आहे. पूर्व भारतातही हे विपुल आढळते. मुंबई व परिसरात या झाडाचे संवर्धन गेली सवाशे ते दीडशे वर्षापासून चालू आहे. **ठाणे महाविद्यालय परिसरात मुख्य दर्शनी भागात व्यवस्थित पद्धतीने रांगेत अशोकाची झाडे आहेत.** भारताच्या बऱ्याच भागात या झाडाला पवित्र मानले जाते. सीता अशोका, खालोखाल याबाबत हे झाड मानले जाते. म्हणून मंदिरांच्या परिसरात ही झाडे लावली जातात. याच कारणास्तव सणावाराला तोरणे बनविताना अशोकाची पाने वापरण्याचा प्रघात आहे. तोरणात असलेल्या झेंडूच्या फुलांचे सौंदर्य वाढविणारी ही पाने म्हणूनच महत्त्वाची मानतात.

**बाह्य वर्णन -** अशोकाचे झाड भव्य, उंच व सदाहरित असते. योग्य वातावरणात याची वाढ झाल्यास साधारण १५ मीटर, व त्याहून उंच वाढू शकेल. याच्या नाजूक फांद्या मूळ खोडाशी सरळ कोनात असतात झाडाचा शेंडा त्रिकोणी पिरॅमिड वा मुकुटासारखा असतो.

**मुख्य जाती -** अशोकाच्या प्रमुख दोन जाती आहेत. आपल्या द्वीपावर असणारी मुख्य जात पॉलिॲथिया लॉंगिफेलिया म्हणून ओळखली जाते याचे वैशिष्ट्य म्हणजे फांद्या फार बाहेर काढत नाहीत तर खोडाला लगटून असल्यामुळे झाडाचा आकार निमुळता पिरॅमिड सारखा किंवा शंकू सारखा दिसतो. झाडाची दुसरी जात पॉलिॲथिया लॉंगिफेलिया-पेंडुला ही होय ! हे झाड अधिक मोठे सुंदर अशा (लंबकासारखा) फांद्यांची बाहेर वाढ झालेले असते. याची रंगछटा फार सुंदर दिसते. दाट

पानांमुळे गारवा देते. या पेंडुला जातीच्या झाडाचे खोड व त्याचा घेर अधिक जाड असतो. दोन्ही जातीतील पाने, फुले व फळे सारखीच असतात. झाडावर पाने पुष्कळ असतात. या गुळगुळीत पानांचा आकार टोकदार बाणासारखा निमुळता असतो. यात अरुंदशा जाळीदार, लाटांसारखा रेषा असतात व त्याही निमुळत्या होत टोकाकडे येताना पानाच्या दोन्ही बाजू चमकदार असतात. पान लहान असताना पोपटी व पारदर्शक असते. पण परिपक्व होत जाते तसा रंग बदलून गडद हिरवा होतो. पान ही काहीसे कडक होते. पानात देठापासून टोकापर्यंत जाणारी सरळ शीर असेल तर तिला दोन्ही बाजूंना पुसटसा २०-२२ उपशीरा असतात.

पानांचा व वैशिष्ट्य पूर्ण आकार, त्यांचे जमिनिशी निमुळते होत जाणे पाहताच ही झाडे अति पर्जन्य वृष्टीच्या प्रदेशातील आहेत हे लक्षात येते. पाने मऊ व खाली वाकलेली असल्याने पानावर साठणारे अतिरिक्त पाणी निथळून जाण्याची नैसर्गिक सोय होते. या झाडाकडे पुष्कळ पक्षी, प्राणी आकर्षित होतात. याची पिकलेली फळे हे पक्षांचे, माकडांचे, वटवाघळांचे आवडते खाद्य. वटवाघळे रात्री फळे खातात व सकाळी झाडाखालील जमिनीवर बियांचा सडा पडलेला दिसतो. यातील काही बिया सहज रुजतात.

### लागवड व मशागत

या झाडाची लागवड बियांपासून होते. बियांची जननक्षमता फार काळ न टिकणारी असल्याने परिपक्व फळातून बाहेर पडल्यावर लगेचच लागवडीसाठी वापराव्या लागतात. बिया सरळ जमिनीत रुजवाव्यात. नुकत्याच फुटलेल्या मुळांची काळजी घेण्याचा दृष्टीने बिया कुंडीत, पॉलिथिन बॅगमध्ये रुजवून नंतर इच्छित ठिकाणीही लावण्याचा प्रघात आहे. झाडाची वाढ कमी गतीने होते. झाड पाऊस वाऱ्यात सहज टिकाव धरते. एका विशिष्ट टप्प्यानंतर कुंडीतून जमिनीत पुनर्लागवड नीट होत नाही.

### उपयोग

१) सणासुदीच्या दिवसात या झाडाची पाने तोरणासाठी वापरली जातात. भारतीय पद्धतीच्या हार पुष्प रचना व हारांसाठीही या पानांचा वापर केला जातो.

२) याची फळे खाद्य म्हणून पक्षी, माकडे व वटवाघळांसाठी उपयुक्त तर ठरतातच पण दुर्भिक्षात माणसेही ही फळे सुरक्षितपणे खाऊ शकतात.

३) या झाडाचे लाकूड ढोल बनविणे, पेट्या बनविणे व पेन्सिल बनविणे या कामासाठी वापरले जाते.

४) झाडाची साल सरपणासाठी वापरली जाते.

५) याच्या खुलून दिसण्याने सौंदर्य, खाली वाकलेल्या उपशाखा व चमकदार पर्णसंभार यामुळे दर्शनी भागात हे झाड लावण्याला उद्यानकलातज्ज्ञ प्राधान्य देतात.

६) कुंपणाच्या भिंतीला लागून उद्यानांमध्ये व निवासी जागेत हे लावले जाते.

७) याच्या उंच वाढीमुळे उद्यानांतील रस्त्यांच्या कडेला हे शोभिवंत ठरते.

८) एका रांगेत ही झाडे लावली तर जोराचे वारे, धूळ यापासून रक्षण होते. वाऱ्याच्या गतीत अडथळा आणून त्याची तीव्रताही कमी करतात.

९) उद्यानकलातज्ज्ञ याचा वापर जागेच्या विपुलतेचा आभास निर्माण व्हावा यासाठीही वापरतात. त्यासाठी शिस्तबद्ध व काळजीपूर्वक पद्धतीने लागवड करतात.

**डॉ. मोझेस कोलेट**
(प्रपाठक, वनस्पतिशास्त्र विभाग,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे)
अनुवाद - प्रा. मोहन पाठक, ग्रंथपाल,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

# अक्षौहिणी म्हणजे किती ?

*अक्षौहिणी म्हणजे नेमके किती ? कौरव पांडवांची सेना अक्षौहिणीत मोजली जाई त्या दृष्टीने या संकल्पनेची चिकित्सा - संपादक*

**स्वरुप**

अक्षौहिणी ही गणितातील एक संज्ञा आहे. अक्षौहिणी म्हणजे नक्की किती ? महाभारतातील सर्वात महान अशा युद्धात कौरवांचे ११ अक्षौहिणी आणि पांडवांचे ७ अक्षौहिणी असे १८ अक्षौहिणी सैन्य होते. परंतु तरीही आपणांस वीरांची एकंदर संख्या कळत नाही. महाभारतात वेगवेगळ्या ठिकाणी १ अक्षौहिणीची संख्या वेगवेगळी दिलेली आहे. हे महाभारतकारांचे अज्ञान नसून काही एका विशिष्ट हेतूने त्यांनी अशी संख्यांची कोडी घातली असण्याची शक्यता गृहीत धरावी लागते.

भारतीय युद्धात पांडवांकडे ७ अक्षौहिणी आणि कौरवांकडे ११ अक्षौहिणी असे एकुण १८ अक्षौहिणी वीर लढत होते. (उद्योगपर्व : अ १५५ श्लो. २६-२७) परंतु अक्षौहिणी ही नक्की किती संख्या आहे हे यावरुन कळत नाही. आदिपर्व अध्याय २ (श्लो. १९ ते २७), उद्योगपर्व ८ (श्लो. ३७ ते ४१) आणि स्त्रीपर्व अध्याय ३६ (श्लोक ९ व १०) अशा चार निरनिराळ्या पर्वात अक्षौहिणींचे निरनिराळे हिशोब दिलेले आहेत. ज्यांचा एकमेकांशी अजिबात मेळ बसत नाही.

या सर्व पर्वातून आदिपर्वातील हिशोब ग्राह्य धरल्यास अक्षौहिणीची स्थूल कल्पना करता येते. या हिशोबाप्रमाणे रथांत बसून लढणारे २१,८७० हत्तीवर बसून लढणारे २१,८७० घोड्यावर बसून लढणारे ६५,६१० आणि पायदळ १,०९,३५० असे एकंदर २,१८,७०० वीर एका अक्षौहिणीत होते. अशा १८ अक्षौहिणी म्हणजे ३९,३६,६०० वीर लढत होते असा निष्कर्ष निघतो. त्याकाळच्या लोकसंख्येच्या मानाने एकूण योध्दयांची ही संख्या अतिप्रचंड होती. एकेका रथात, एकेका हत्तीवर एकापेक्षा जास्त योद्धे बसणे शक्य होते.

प्रत्येक हत्तीवर दोन अंकुशधर, दोन धनुर्धर, दोन खड्गधर, १ शक्तीधर व एक त्रिशुळधर असे आठ वीर बसत असत. (उद्योगपर्व १५५.१७). वरील वाक्यातून असे लक्षात येते की दोन अंकुशधर हे माहुत होते परंतु इतर सर्व तर योद्धे होते. म्हणजे हत्तीवरील स्वार होतात १,३१,०२०. याप्रमाणे एक अक्षौहिणी होतात. ३,२७,८५० याप्रमाणे १८ अक्षौहिणी म्हणजे ५९,०१,३०० ही संख्या देखील अशक्य कोटीतील आहे.

आता उद्योगपर्वातील पुढील श्लोक घेतला तर;

सेना पंचशतं मागा रथास्तावन्त एव च ।

दशसेना च पृतना दशवाहिनी ।

म्हणजे सेना, वाहिनी, पृतना, ध्वजिनी, अक्षौहिणी, वरुथिनी हे सर्व पर्यायी शब्द आहेत असे सांगितले आहे.

नराणां पन्च पन्चाशदेषा पत्तिर्विधीयते ।

यात आदिपर्वाप्रमाणे कोष्टकाचा प्रारंभ पत्तीपासून केला आहे. पण पत्ती म्हणजे ५५ माणसे असा भलताच हिशोब दिला आहे.

पुढे ३ पत्ति म्हणजे १ सेनाप्रमुख

३ सेनामुख म्हणजे १ गुण्य

३ गुण्य म्हणजे १ गण

(पान पृष्ठ क्र.२९वर)

# चित्रकला : दृष्टिकोन

*लहान मुलांना चित्र काढायला शिकवताना गोळा म्हणजे सूर्य, त्रिकोण म्हणजे डोंगर, चौकनावर त्रिकोण म्हणजे घर असं पहिल्या छूट त्या मुलाला शिकवून, त्याच्या सर्जनशीलतेचे आपण पहिल्या फटक्यातच पंख छाटतो. छाटतो ना? अशाच आपल्यासारख्या असंख्यांचे डोळे उघडायला लावणारी ही विशेष लेखमाला. 'चित्रपालवी' ही लिहिलीय ठाण्याच्या डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या कलाशिक्षिका चित्रकला मंजिरी दांडेकर यांनी.- संपादक*

शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात चित्रकला विषय अनेक वर्षांपासून आहे. पण सध्याची परिस्थिती अशी आहे की, या विषयाची जाण व व्याप्ती आमच्या शिक्षणतज्ज्ञांना, शालेय व्यवस्थापकांना व मुख्याध्यापकांना समजलेली नाही. हे खेदाने सांगावेसे वाटते. आपल्या महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र कलासंचालनालय असून कलेची ही दुरावस्था. आपल्यासारख्या प्रगत राज्यात इ. आठवीपर्यंत हा विषय सक्तीचा व पुढे नववी व दहावीला ऐच्छिक. त्यातही जिथे तिथे संगणकाचे आक्रमण. त्यामुळे या विषयाला महत्व कमी. अजूनही शिक्षणशास्त्रज्ञ हा विषय टाकाऊच समजतात. Art is not bread indeed, but it's a wine of life हे त्यांच्या लक्षातच येत नाही. खरे तर, चित्रकला ही सहज, साधी, सोपी, सर्वांना समजणारी अशी भाषा. जिथे भाषेचा अडसर येतो, तिथे चित्रकला कामास येते. तरीही शाळेतील इतर विषयांबरोबर या विषयाला स्थान नाही. हा विषय सर्वांना सक्तीचा हवा. कारण याच्या शिक्षणाने विद्यार्थी एक माणूस म्हणून व सुजाण, समृद्ध नागरिक बनण्यास मदत होते. The child opens a window of joy and beauty through the medium of art.

कला म्हणजे अभिव्यक्ती याबद्दल दुमत नाही. कला ही रसिकाला स्थलकालाच्या बंधनापलिकडे नेऊन सोडते. मानवी जीवन हे कलेच्या योगाने समृद्ध बनते. कलाविरहीत जीवन म्हणजे कलेवरच. ज्ञानसाधनेने मनुष्याची बुद्धी वाढते तर कलेच्या अभ्यासाने त्याच्या जीवनाचे भावनात्मक अंग परिपुष्ट होते.

या कलेची महती पाश्चिमात्यांना समजली तशी आपल्याकडेही काही साहित्यिक, विचारवंतांना समजली. कलेची महती सांगताना भर्तृहरी म्हणतो, 'साहित्य संगीत कला विहीनः साक्षात् पशुः पुच्छ विषाण हीनः।'

''कला ही भूतकाळाची कन्या, वर्तमानकाळाची पत्नी व भविष्यकाळाची माता आहे.'' - वि. स. खांडेकर.

''माणूस हा सौंदर्य प्रेमी आणि सौंदर्य निर्माण करणारा आहे. सौंदर्याशिवाय त्याला चैन पडत नाही. आनंद देण्याची वृत्ती कलेत असते, कलेतूनच जगण्याची ऊर्मी येते. या कलाच जगण्याचा आनंद देतात'' - पु.ल. देशपांडे.

''मुलांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी त्यांचा अभ्यासक्रमात कला व क्रिडा यांचा अंतर्भाव हवाच''- म. गांधी.

कला या विषयाबाबत निव्वळ उपयुक्ततेची कसोटी लावण्यात येते. कलेची जरुरी सर्वांना नाही असे गृहीत धरले जाते. या आधारभूत सिद्धांतावरच पुढील निर्णय घेतले जातात. त्याच न्यायाने प्रत्येक विद्यार्थी डॉक्टर किंवा इंजिनियर होणे अशक्य असते. हे लक्षात घेतले जात नाही. इंग्रजी, गणित, सायन्स या विषयांची सक्ती विद्यार्थ्यांवर होते. हेच विषय सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक मानले जातात. पण कलेची जरुरी पटत नाही किंवा पटवून घेतली जात नाही.

जगातील इतर प्रगत देशात या विषयाचे महत्त्व व जाण शिक्षणतज्ज्ञांना खूपच आहे. त्यांचे त्या दृष्टीने प्रयोगही चालू असतात. चित्रकलेतून ज्ञान ही नैसर्गिक गोष्ट आहे. चित्रकलेतून बुद्धीचा विकास होतो हे त्यांना (पाश्चात्यांना) पटलं, हे महत्वाचं. त्यामुळे मन, हात, डोळे यांना उपयोग करुन येथील विद्यार्थी अत्यंत सुलभतेने विषय समजावून घेऊ शकतात. दुसऱ्या कोणत्याही विषयात अशी ताकद नाही.

शिक्षण विचारात 'थ्री एच' (Three 'H') ना फार महत्त्व आहे. हे थ्री एच् म्हणजे Hand, Head & Heart हात, बुद्धि आणि हृदय. बुद्धीविकासाच्या शिक्षणाला हृदय शिक्षणाची जोड हवी आणि या दोन्हीला हातामधील सृजनशीलतेच्या शिक्षणाची क्रियाशील सोबत हवी. आपले हात ही आपल्याला लाभलेली अनमोल देणगी. आपल्या हातातल्या सृजनशील शक्तीत प्रतिसृष्टी उभारण्याची हिंमत आहे. हात माणसाला जवळ घेऊन पाठीवरुन हात फिरवतात. मानवी भावनांचा विकास करुन त्यांना व्यापक बनवतात, असे भावशिक्षण झाले नसेल तर हेच हात मारामारासाठी, कचित प्रसंगी गळा घोटण्यासाठीही पुढे सरसावतात.

सर्व ललितकलांचा - चित्र, शिल्प, नाट्य, संगीत इ. चा सर्वंकष शुभंकर आविष्कार हातातूनच होतो. तसेच जाळपोळ, मोडतोडही हातांकडून होते. या हातांकडून विघातक कामे होण्यापेक्षा विधायक कामे व्हायला हवीत. आजच्या शिक्षणात गृहपाठ उतरवून काढण्यापलिकडे किंवा पेपर लिहिण्यापलिकडे हातांना कामच नाही. कामाशिवायचे हात म्हणजे गंजलेले हात. गंजलेले हात ही भयंकर गोष्ट आहे. म्हणून आनंदमय सृजनशील हातांच्या शक्तींचाही विकास होईल, अशी तरतूद शिक्षणात असावयास हवी. वरील सर्व विवेचनावरुन एक गोष्ट लक्षात येईल की चित्रकला हा एक जबरदस्त विषय आहे. या विषयाला अग्रहक्क दिल्याशिवाय शालेय जीवनाला परिपूर्णता येणार नाही. हा विचार मनात पक्का झाल्यावर याला जबाबदार असणाऱ्या सर्वांनीच आपली कामे चोख करायला हवीत. कारण यातच समाजाच्या उन्नतीचा मार्ग आहे. त्यात सरकार, शिक्षणतज्ञ, शालेय मुख्याध्यापक, संस्थाचालक, पालक, मुलांनी आपापला महत्त्वाचा वाटा उचलायला हवा.

**मंजिरी दांडेकर**
कलाशिक्षिका
डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
ठाणे ४०० ६०२

---

(पान पृष्ठ क्र. २७ वरून)

**अक्षौहिणी म्हणजे किती ?**

असे सांगून गण १०,००० ने होत असे सांगितले आहे. पण प्रत्यक्षात मात्र गण १४८५ लोकांचे होतात.

शल्याच्या सेनापत्याच्या वेळी युद्धाच्या १८व्या दिवशी ३ लाख स्वार, ३ कोटी पायदळ कौरवांकडे होते. तर १०,००० स्वार व दोन कोटी पायदळ पांडवांकडे होते. शिवाय स्त्रीपर्वाच्या शेवटी ह्या संग्रामात एकंदर ६६ कोटी १ लक्ष ३० हजार लोक मेले असे वर्णन आहे. पण प्रत्यक्षात मात्र वीरांची संख्या ५९,०१,३०० होते.

वरील सर्व वर्णनावरुन असे लक्षात येते, "१ अक्षौहिणी म्हणजे किती ? आणि ती संख्या तार्किक दृष्ट्या बरोबर आहे का हे महाभारतातील एक गूढच आहे!"

(९२-९३ च्या सुमारच्या फाउंडेशन कोर्स प्रकल्पातून)

- माजी विद्यार्थी

# वर्ल्ड फोरम ऑन अर्ली चाईल्ड हूड केअर अँड एज्युकेशन - कॅनडा एक वृत्तान्त

World Forum Foundation for Early Childhood Care & Education ही अमेरिकेतील, बालशिक्षणात गेली ३० वर्षे काम करणारी संस्था आहे. बालशिक्षण संबंधातील Childcare Information Exchange नावाचे द्वैमासिक प्रकाशित करणे, 'World Forum' ही बालशिक्षणासंबंधीची जागतिक परिषद वेगवेगळ्या देशात भरविणे, बालशिक्षण संबंधातील अनेक पुस्तके प्रकाशित करणे व बालशिक्षणाशी निगडित असे विविध उपक्रम राबविणे हे या संस्थेचे कार्य. याचे मुख्य कार्यालय रेडमंड, वॉशिंग्टन येथे आहे.

गेली ४ वर्षे या संस्थेतर्फे, त्यांच्या World Forum on Early Childhood Care & Education या बालशिक्षणातील जागतिक परिषदेसाठी ग्रीस, न्यूझीलंड, मेक्सिको व या वर्षी कॅनडा येथे मला वेगवेगळ्या विषयावर सादरीकरण देण्यासाठी आमंत्रित केले होते. या वर्षी मी 'Play-The Universal Language of Children' व 'Brain Research and Early Eduacation' हे दोन विषय मी सादर केले.

दि. १५ मे रोजी मी एअरइंडियाची लंडन मार्गे, पुढे एअर कॅनडाला जोडणारी फ्लाईट पकडून दि. १५ मे संध्याकाळी (कॅनडाची वेळ व दिवस) मॉंट्रियल येथे पोचले, World Forum, 'हॉटेल ले सेंटर शेरॅटॉन' येथे होणार होती आणि बऱ्याच सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींची निवासाची सोय येथेच केली होती, बालशिक्षण व्यवसायातील अनुभवी व्यक्तींचा आपापल्या देशातील अनुभव व विचारांच्या देवाण घेवाणीचा चिरंतन प्रवाह चालू रहावा व ठेवावा हा या परिषदेचा प्रमुख हेतू. बालशिक्षण कार्याला वाहून घेतलेल्या अनेक श्रमिक व्यक्ती, ज्या चिमुकल्या बालकांचे दर्जेदार शिक्षण व उज्वल व आनंददायी जीवनासाठी सतत झटत असतात, अशा व्यक्ती इथे भेटतात. त्यांचे कार्य, त्यांचे अनुभव आणि त्यांच्या कामाचा आवाका पाहिला, जाणवलं की आपल्याकडे, आपल्या मुलांसाठी काम करण्याचा उत्साह व हुरुप द्विगणित होतो. या ठिकाणी मला प्रत्येक वर्षीच्या परिषदेमध्ये असं जाणवलं की जगात कितीतरी मुलं अशी आहेत की जी शिक्षण तर सोडाच, पण साध्या मूलभूत गरजांपासून सुद्धा वंचित आहेत तर बिचाऱ्यांना बालहक्कांची जाणीव तरी कुठून असणार. अनेक ठिकाणी सतत युद्धाच्या छायेत किंवा हिंसक वातावरणात, जन्मल्यापासूनच दहशतीखाली ही मुले असतात. पॅलिस्टाईन, रेवांडा, नॉर्दन आयर्लंड इ. सारख्या देशांमधे तर मुलं सतत शस्त्रास्त्र व हिंसा हेच बघत असतात. केनिया, नायजेरिया सारख्या देशांत मुले कमालीच्या दारिद्र्यात रहात आहेत.

या वर्षीच्या World Forum च्या तारखा होत्या १७ मे ते २१ मे यंदाच्या वर्षी सर्वात अधिक उपस्थिती होती. जगभरातील एकशे दहा राष्ट्रे व आठशे पन्नास प्रतिनिधी प्रेझेंटेशन देणार होते. भारतातून यंदा सात प्रतिनिधी निरनिराळ्या ठिकाणाहून उपस्थित हाते. हे माझं आमंत्रित केल्याचं चौथं वर्ष होतं म्हणून या वर्षी मला भारताची राजदूत हे पद प्रदान करण्यात आले. प्रत्येक देशाच्या राजदूतांना ओळखपत्र म्हणून वेगळा बॅच दिला जातो.

दि. १७ मे रोजी सायंकाळी ७ वाजता World Forum चा औपचारिक उद्घाटन सोहळा सुरु झाला, त्या आधी राजदूत प्रतिनिधी व प्रेझेंटेशन देणारे प्रतिनिधी यांची सभा झाली. यामध्ये प्रत्येक प्रतिनिधीने आपापल्या देशातील बालशिक्षणा संबंधातील परिस्थितीचा आढावा घेतला. मी 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषदे' ची राष्ट्रीय प्रतिनिधी या नात्याने आपल्या देशातील एकूण बालशिक्षणा संबंधीचा समाजाचा व शासनाचा असलेला दृष्टिकोन अधोरेखित केला. कॅनडाच्या कुटुंब कल्याण मंत्री श्रीमती कॅरल थेबर्ग यांच्या हस्ते शानदार उद्घाटन झाले. पंचतारांकित हॉटेल मधले उद्घाटन ते एखाद्या स्वप्ननगरीत असल्यागत वाटत होते. असंख्य लोक भेटत होते, असंख्य लोक चर्चा करीत होते. विचारांची देवाणघेवाण होत होती. श्रीमती थेबर्ग यांनी त्यांच्या भाषणात कॅनेडियन सरकारच्या बालशिक्षणातील काही धोरणांचा उल्लेख केला. यानंतर कॅनेडियन यजमान कमिटीचे औपचारिक रित्या स्वागत करण्यात आले व गेल्या World Forum यजमान कमिटी (मेक्सिको), यांनी World Forum चा पारंपारिक द्रोण कॅनेडियन कमिटीच्या हाती सुपूर्द केला. या नंतर जगभरातील विविध देशांमध्ये बालशिक्षणाच्या कार्याची धुरा समर्थपणे वाहणाऱ्या व World Forum Foundation शी सहकार्य असणाऱ्या ज्येष्ठ व श्रेष्ठ मान्यवर व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. या मध्ये नॉर्दर्न आयर्लंडच्या लेडी मोयरा कॅंपबेल व श्रीमती सिस, व माली येथील डायडायरॅटन सोगोडोगोई यांचा समावेश होता.

१८ मे पासून परिषदेची सत्रे सुरु झाली. रोज सकाळी सर्व प्रतिनिधींसाठी प्लेनरी सेशन व्हायची व त्यानंतर तीन सत्रांमध्ये एकावेळी समांतर अशी आठ सत्रे वेगवेगळ्या सभागृहात व्हायची, रोज सकाळच्या प्लेनरी सत्रांमध्ये एकत्रित विषय होता. The Power of Early Childhood as a force for Reconciliation. या मध्ये नॉर्दर्न आयर्लंड, कोलंबिया, पॅलिस्टिन व चाड या देशांतील प्रतिनिधींनी पुढील विषयांवर भाष्य केले. - 1) Impact of violence on a child 2) The response of School, Community and a country towards Early childhood education. या मधे चाड व पॅलिस्टीन च्या अली शार व फेलिसियन टाकीयीमान यांनी स्वत:च्या मुलांच्या बाबतीतील हिंसा व दहशतवादाचा परिणाम सांगत असताना संबंध सभागृह आसवे गाळत होतं.

पुढील दर दिवशीच्या समांतर सत्रांमध्ये विविध देशांतील सुमारे तीस प्रतिनिधींनी पुढील व इतर अनेक विषयांवर प्रेझेंटेशन्स् दिली. Play the Universal language of Children, Health & Safety in childcare settings, Preserving Indigeneous Cultures, Designing environments, Teacher education, Cultures & leaderships, Distant learning, Advocacy for Early Childhood Development, Curriculum Models, Art & Music, Language Development, Brain Research & Early Education, Working with Parents, Training Rural areas, Organisation show cases, children & poverty, Quality control in Multisite organisations, Power of Early childhood as a heating force in the AIDS Crisis.

मी Play-The Universal Language of Children या विषयावर इतर बारा देशांतील प्रतिनिधींबरोबर २ सत्रे घेतली. या मध्ये आपापल्या देशातील मुलांच्या खेळांचे प्रकार, मुलं कोणत्या खेळात रमतात या वरील चित्रफिती सादर करुन चर्चा केली. या मध्ये ठोकळे, पाणी, वाळू, माती, चिंध्या, बाहुल्या, टाकाऊ वस्तू, या सर्व वस्तूंशी खेळताना मुले आपल्या परंपरा, संस्कृती, रीती, वेशभूषा, पद्धती या सगळ्या गोष्टी प्रदर्शित करतात. बारा देशांच्या बारा जणांच्या पॅनल व उपस्थित प्रेक्षकांनी हाच निष्कर्ष काढला की देश, भाषा, प्रांत, रिती-रिवाज या सर्वांच्या पलिकडे जाऊन खेळ हा कोणत्याही बालकाच्या आयुष्यातील अविभाज्य घटक आहे व कोणत्याही

सामाजिक व आर्थिक स्तरावरील असो, ते बालक स्वयंप्रेरणेने खेळता खेळता, स्वत:ची करमणूक तर करतेच पण अनेक गोष्टी शिकतही जाते, व प्रामुख्याने प्रौढांचे अनुकरण करायला त्यांना फार आवडते.

माझ्या दुसऱ्या प्रेझेंटेशनचा विषय होता Brain Research and Early Education या मध्ये मज्जाशास्त्रातील संशोधनावर प्रकाश टाकून त्याच्या निष्कर्षांचा बालशिक्षण, म्हणजेच शून्य ते दहा वर्षे वयापर्यंतच्या शिक्षणाशी असलेला संबंध व परिणाम, मेंदू आधारित शिक्षणाशी निगडित काही तत्वे, व सध्याच्या प्रचलित मेंदू आधारित शिक्षणाशी निगडित काही तत्वे, व सध्याच्या प्रचलित शिक्षण पद्धतीचे मिथ्याग्रह व त्याचे परिणाम या विषयीचा माझा शोध निबंध सादर केला. व बालशिक्षिका म्हणून आलेल्या शाळेतील अनुभवांवर अभ्यास करुन त्या विषयीचे विचार मांडले. माझ्या बरोबर माझ्या सहकारी होत्या डॉक्टर पॅम शीलर. या अमेरिकेतील सायप्रस येथील असून Wright Group च्या McGraw-Hill या संस्थेच्या National Curriculum Specialist आहेत. या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या लेखिका व वक्त्या असून बालशिक्षण व्यवस्थापन क्षेत्रामध्ये त्यांचा गाढा अनुभव आहे.

पाच दिवस असणाऱ्या या जागतिक परिषदेमधे बऱ्याच गोष्टी अनुभवायला व शिकायला मिळतात. या ठिकाणी अनेक देशांचे बालशिक्षण मंत्री उपस्थित होते, व त्यांच्याशी गप्पा व चर्चा करण्याची संधी मिळाली. तेव्हा मला असं वाटायला लागलं की ज्या देशांना 'बालशिक्षण' मंत्री लाभलेले आहेत त्या देशाचे भवितव्य खरोखरच उज्ज्वल आहे. तेव्हाच विचार आला की भारताला 'बालशिक्षण मंत्री' तर सोडाच, परंतु 'बालशिक्षण' तरी शिक्षणमंत्र्यांना कितपत कळतं कोण जाणे, किंबहुना जगाच्या कोणत्या तरी कोपऱ्यात अशी काही 'बालशिक्षण' संबंधातील जागतिक परिषद भरली आहे हे सुद्धा माहीत नसेल. याच ठिकाणी अत्यंत गरीब, मागासलेल्या देशांच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्याची संधी मिळाली. युद्ध, हिंसा यांच्या छायेत ज्या देशांची मुले जगत आहेत त्यांना हेच सांगावंस वाटत की माझ्या देशातील काश्मीरमधील बालकांची परिस्थिती पण हीच आहे आणि दुर्दैवाने त्यांच्यासाठी काही करण्याचे, त्यांच्यापर्यंत पोचण्यासाठी लागणारा वेळ मी किंवा मी ज्या चळवळी मधून (बालशिक्षण परिषद) काम करते, आम्ही देऊ शकलेलो नाही.

शेवटच्या दिवशी सांगता समारंभ अतिशय शानदार पद्धतीने व मेजवानी देऊन झाला. World Forum हा एक असा अविस्मरणीय सोहळा असतो की इतका अनुभव, इतकं प्रेम, इतका जिव्हाळा, इतकी आपुलकी मी इतर अधिवेशने किंवा परिषदांमधून क्वचितच अनुभवले आहे.

ही परिषद संपल्यानंतर मॉन्ट्रियल, ओटावा, क्वेबेक, टोरोन्टो या शहरांमधून फिरले. अतिशय निसर्गरम्य व अप्रतिम सुंदर अशी ठिकाणं पाहिली. बाजारपेठ, मॉल, बँका, पोस्ट ऑफिस, हॉस्पिटल, रेल्वे स्टेशने, बालशाळा अशा ठिकाणी मुद्दाम अभ्यासू वृत्तीने फिरले. निरनिराळे अनुभव आले, व पुढील World Forum च्या दृष्टीने तयारी करण्यासाठी I Love My India करत माझ्या देशात, बालशिक्षणात काम करण्यासाठी परतले. सर्व World Forum च्या साथीदारांना जड अंत:करणाने निरोप देताना वियोगाच्या दु:खापेक्षा पुनर्भेटीच्या प्रतीक्षेत राहू असे वचन देऊन सर्वांचा निरोप घेतला.

**विशाखा देशपांडे**
ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळा
ठाणे.
भ्रमणध्वनी- ९८२०९२६६५७

# पुरस्काराची जबाबदारी

यंदाचा दर्पण पुरस्कार हा पत्रकारितेतील मानाचा पुरस्कार श्री. मिलिंद बल्लाळ यांना जाहीर झाला. या निमित्ताने या पुरस्काराची जबाबदारी त्यांनी सदर लेखात व्यक्त केली आहे. - संपादक



श्री. मिलिंद बल्लाळ

मराठी पत्रकारितेचे जनक आणि आद्य पत्रकार म्हणून ओळखले जाणारे 'दर्पण' कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मला पत्रकार दिनी म्हणजे ६ जानेवारी रोजी 'दर्पण' कारांच्या जन्मगावी (पोंभुर्ले, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथे) देण्यात आला. यापूर्वी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे देण्यात येणारा रावसाहेब गोगटे पुरस्कार मला मिळाला होता. अतिशय प्रतिष्ठेचे समजले जाणारे हे पुरस्कार मला मिळाल्यामुळे पत्रकारितेकडे बघण्याची माझी दृष्टी अधिक प्रगल्भ होणार आहे. पुरस्कारांमुळे उत्तरदायित्वही वाढत असते याची मला जाणीव आहे आणि माझी निवड करणाऱ्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पत्रकारांची निराशा होणार नाही याची मी काळजी घेत राहणार यातही वाद नाही.

बाळशास्त्रींनी ६ जानेवारी १८३२ रोजी अवघ्या २० व्या वर्षी 'दर्पण' हे पाक्षिक सुरु केले होते. त्याचवर्षी एप्रिल महिन्यापासून त्याचे साप्ताहिकात रुपांतर करण्यात आले होते. स्वतः बाळशास्त्री यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून जनप्रबोधनाची भूमिका चोख बजावली. त्यांना अनेक भाषा केवळ अवगत नव्हत्या तर त्यावर त्यांचे प्रभुत्व होते. ते केवळ उत्तम शिक्षक, विद्वान, ग्रंथकार नव्हते तर देशोन्नतीच्या निरनिराळ्या चळवळींना त्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष चालना दिली. बाळशास्त्री अवघ्या ३५व्या वर्षी निवर्तले पण त्यांचे हे अल्प आयुर्मान ज्ञानोपासनेत आणि ज्ञानदानात गेले. इंग्रजी, मराठी, संस्कृत, बंगाली, कन्नड आदी नऊ भाषा त्यांना अवगत होत्या. तसेच इतिहास, गणित, पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, पुरातत्त्व अशा विविध विषयांत त्यांना रस होता.

बाळशास्त्रींचे हे कर्तृत्व पुरस्कार स्वीकारताना माझ्यासारख्या पत्रकाराला निश्चितच स्फूर्तिदायक ठरेल. अनेकदा जाहिरात हाच वृत्तपत्रांचा केंद्रबिंदू मानला जाऊ लागला आहे. **प्रबोधनापेक्षा मनोरंजनाची मात्रा वाढू लागल्यामुळे समाजाचे सोडा पण पत्रकारितेचेही आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे.** वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरावर संपादकापेक्षा जाहिरात आणि वितरण खाते यांचेच नियंत्रण येऊ लागले आहे. थोडक्यात वृत्तपत्रांमध्ये आमूलाग्र बदल होऊ लागले आहेत आणि पत्रकारितेची मूळ उद्दिष्टे काहीशी धुसर होऊ लागली आहेत. विश्वासार्हता आणि नैतिकता या मूल्यांना पाहिजे तितके मोल राहिले नसून पत्रकारिता एका विचित्र वळणावर येऊन उभी आहे. आजच्या पत्रकारितेचे 'दर्पण'कार जनक असले तरी त्यांचे महत्त्व ऐतिहासिक स्वरुपापर्यंत मर्यादित

राहिले आहे. आजच्या वर्तमान(पत्रा) ने भूतकाळाशी नाळ तोडली आहे, हेच खरे.

नवीन वर्ष सुरु झाले आहे आणि २००६ हे प्रसिध्दी माध्यमांच्या दृष्टीने कसे असेल यावरही बराच ऊहापोह झाला आहे. साक्षरतेचे वाढते प्रमाण आणि समाजाची वाढत जाणारी जिज्ञासा यामुळे मुद्रित माध्यमाप्रमाणेच दृकश्राव्य (इलेक्ट्रॉनिक) माध्यमांचे जाळे वाढत जाणार यात वाद नाही. एकट्या मुंबईचेच उदाहरण घ्यायचे झाले तर २००५ साली टाइम्स ऑफ इंडियाला टक्कर देण्यासाठी हिंदुस्थान टाइम्स आणि डीएनए यांनी बाजारपेठेत प्रवेश केला. मुंबईतील टाईम्सची मक्तेदारी तोडण्याचे त्यांचे प्रयत्न असून आता सहा महिने लोटले तरी जाहिरात आणि वितरण आघाड्यांवर या दोन नवीन खेळाडूंनी 'गंभीर' अशी कामगिरी केलेली दिसत नाही. एक मात्र खरे की टाईम्सला आपल्या संपादकीय खात्यात काही बदल करुन वर्तमानपत्र लोकाभिमुख कसे होईल हे पहावे लागले. (बरेच दिवसांनी जाहिरातदारांऐवजी वाचकाला महत्व आले!) मुंबईतील टाइम्सची एकट्याची उलाढाल ही सर्वसाधारणपणे एक हजार कोटी रुपयांवरची आहे. ती काबीज करण्यासाठी गरमागरम आणि खुसखुशीत मजकूर द्यावा लागतो. आमिर खानच्या दुसऱ्या लग्नाला, अण्णा हजारेंच्या आंदोलनापेक्षा, नर्मदा आंदोलनाऐवजी, संगीतकार नदीमला भारतात कधी आणणार याला महत्त्व मिळू लागले. उद्याच्या वाचकाला राजकारणात रस नाही असा फसवा युक्तीवाद करुन गुळगुळीत कागदावर गोंडस चेहरे छापून अनेक संपादक वाचकांची दिशाभूल करु लागले **आणि ही मंडळी संपादक कमी जाहिरातदारांचे प्रवक्ते अधिक बनले**. समाज किती शहाणा झाला यापेक्षा बॅलन्सशीटमध्ये नफा किती वाढला, यावर संपादकांचे भवितव्य ठरु लागले आहे. परकीय गुंतवणुकीला परवानगी मिळाली असून 'स्ट्रॅटेजिक-अलायन्स' अर्थात मुत्सद्दीपणे केलेली भागीदारीच्या नावाखाली पत्रकारितेला पूर्णपणे बाजारी रुप बहाल करण्यात आले आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ स्टिंग ऑपरेशनला आपले एकमेव कर्तव्य समजू लागला आहे. विधायकतेपेक्षा आक्रमक राहिलो तरच टिकू, असे पत्रकारांना वाटू लागले आहे. उपयुक्ततेपेक्षा उपद्रव मूल्याला महत्त्व आले आहे. ही आजच्या पत्रकारितेची खरी शोकांतिका आहे.

जीवघेण्या स्पर्धेमुळे वर्तमानपत्रांवर अस्तित्वाची लढाई करण्याची वेळ आली आहे. भरीस भर दृकश्राव्य (इलेक्ट्रानिक) माध्यमांचा दबाव वाढत चालला आहे. **'सबसे तेज' धावतांना सगळ्यांचीच दमछाक करु लागली आहे. विश्वासार्हतेचे तर या स्पर्धेसाठी नावही घेतले जात नाही.** ती काय धावणार ? ती तर चालतही नाही! असा सगळा विचित्र मामला बनला आहे. छोट्या बातम्यांना फाजील महत्त्व आणि महत्त्वपूर्ण बातम्यांकडे दुर्लक्ष असे वारंवार होऊ लागले आहे.

एखाद्या गुंडाला पोलिस फरफटत नेतात आणि टी. व्ही. चॅनलवाले त्याचे उदात्तीकरण करतात, बेकायदा इमारती बांधणारे खोटे अश्रू ढाळतात आणि छोट्या पडद्यावर त्यांच्या मुलाखती दाखवल्या जातात. दांभिक नेते नैतिकतेवर भाषण करतात आणि चॅनलवाले त्यांची 'बाईट' घेण्यासाठी धावतात. छोटी माणसे मोठी करण्याची किमया प्रसिद्धी माध्यमातील स्पर्धेमुळे शक्य होऊ लागली आहे. खरे पडद्याआड जाऊ लागले आहे आणि जे खरे असते ते सनसनाटी असल्याशिवाय त्याकडे कोणीही ढुंकुन पहात नाही।

स्थानिक दैनिकांची या स्पर्धेत तर प्रचंड कोंडी होत आहे. 'पुढारी' कार पद्मश्री बाळासाहेब जाधव यांनी ही खंत व्यक्त केली. 'किंमत युद्ध' (Price War) घोषित करुन अनेक साखळी वर्तमानपत्रातले स्थानिक दैनिकांची गळचेपी करीत आहेत. वर्तमानपत्रे विकत घेऊन वाचायचेच नसते अशी सवय लावण्यामागे निश्चितच एक अनैतिक

विचार आहे. काळा पैसा ओतला जात आहे. वर्तमानपत्राचा वापर वाचकांच्या हितापेक्षा स्वत:च्या हितासाठी होऊ लागला आहे.

ठाण्यासारख्या ठिकाणी स्थानिक दैनिक अधिक आव्हानात्मक होऊ लागले आहे. मुंबईची वर्तमानपत्रे, जी प्रादेशिक मानली जातात, ती स्थानिक बातम्यांना पूर्वीपेक्षा जास्त जागा देऊ लागली आहेत. त्यांचा खरे तर प्रवास राष्ट्रीय पातळीकडे व्हायला पाहिजे होता. परंतु इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांनी त्यांना बेदखल केले आहे. मुंबईच्या वर्तमानपत्रांचे मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री स्थानिक दैनिकांकडे नाही. ही विसंगती वाचक मात्र लक्षात घेत नाही. त्यामुळे स्थानिक दैनिकांची तुलना मुंबईच्या वर्तमानपत्रांशी नकळत होत रहाते. हा त्रास मुंबईपासून दूर ग्रामीण भागात प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकांना नाही. मुळातच वाचनासाठी दिल्या जाणाऱ्या वेळेत मोठी कपात झाली आहे. स्थानिक दैनिके जरी स्थानिक बातम्यांना प्राधान्य देत असले तरी सर्वसामान्य नागरिक स्थानिक राजकारणात पाहिजे तितका रस घेत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत आपला जुना वाचक टिकवणे आणि नवा निर्माण करणे हे कठीण झाले आहे. 'ठाणेवैभव' मधून आम्ही नवनवीन प्रयोग करुन मुंबईच्या वर्तमानपत्रांबरोबर गुणात्मकदृष्ट्या रहाण्याचा प्रयत्न करीत आहोत. 'ठाणेवैभव' मधून प्रसिद्ध होणाऱ्या अग्रलेखात बातम्यांना आदी मजकुराला वाचकांच्या प्रतिक्रिया लाभणे, हे आम्ही जमेची बाजू असल्याचे मानतो. बरेच काही करण्यासारखे आहे. त्या ओळखून आम्ही योग्य ते बदल करीत असतो. थोडक्यात तीन दशकानंतरही 'ठाणेवैभव' मधून आम्ही प्रयोगशीलता जपत आहोत. त्यामुळेच बहुधा आम्ही टिकून आहोत. स्थानिक पत्रकारितेच्या उपयुक्ततेबद्दल माझ्या मनात कोणताही संदेह नाही. जांभेकर पुरस्कारामुळे मला प्रोत्साहन मिळणार आहे.

पत्रकारितेच्या अंतरंगातील हे बदल अस्वस्थ करणारे आहेत त्यांचे अर्थकारण तर मती सुन्न करणारे आहे. अशा विचित्र वर्तमानात बाळशास्त्री जांभेकर यांनी शिकवलेली पत्रकारिता कशी टिकणार हा खरा प्रश्न आहे. त्यांच्या नावाने मिळालेला पुरस्कार मला हे उत्तर शोधण्यास उद्युक्त करणारा आहे. नव्हे ते मी माझे उत्तरदायित्व समजत आहे, निश्चित!

श्री. मिलिंद बल्लाळ
संपादक, ठाणेवैभव
ठाणे. ४००६०१
(ठाणेवैभवच्या सौजन्याने)

## काही स्थापना दिन साहित्य क्षेत्रातले

| | |
|---|---|
| साहित्य अकादमी - | १९५४ |
| राज्य मराठी विकास संस्था - | १ मे १९९२ |
| महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था - | १८९४ |
| अक्षरधारा प्रतिष्ठान - | १३ ऑक्टो. १९९३ |
| मराठी जनसाहित्य प्रतिष्ठान - | २७ ऑक्टो. १९८६ |
| का. स. वाणीप्रगत अद्यावत संस्था - | २७ जून १९८७ |
| झाडी बोली साहित्य परिषद - | १९९१ |

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर

दिवाळीच्या सुट्टीनंतर दि. १२ नोव्हेंबर ०५ पासून शाळेचे दुसरे सत्र सुरु झाले.

१८ नोव्हे. आणि १९ नोव्हेंबर या दोन दिवसांत ऑप्टीशियन श्री. मयेकर यांच्यातर्फे आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे डोळे तपासणी झाली.

२४ नोव्हे. ते २७ नोव्हे. या कालावधीत क्रिडास्पर्धा झाल्या. यांत वैयक्तिक तसेच खो-खो, कबड्डी, लंगडी यासारखे सांघिक खेळ घेतले गेले.

सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत आपल्या शाळेत ३ डिसेंबर रोजी गटसंम्मेलन झाले. त्यांत श्री. धोंडेसरांनी संस्कृतचा आदर्शपाठ घेतला. तसेच सौ. मीरा लिमये व त्यांच्या काव्यप्रेमी मैत्रिणींनी ६वी ते ८वीच्या पाठ्यपुस्तकातील कवितांचे रसग्रहण केले. सौ. मधुरा बापट यांनी विद्यार्थ्यांचे 'भावनिक संतुलन' या विषयावर व्याख्यान दिले.

२६ नोव्हें. रोजी दादोजी कोंडदेव स्टेडियमवर घंटाळी क्रिकेट कपच्या अंतर्गत एक दिवसीय सामन्यात आपल्या शाळेतील १५ वर्षाखालील संघाने सरस्वती विद्यालय, राबोडी. या शाळेचा ६१ धावांनी पराभव केला. आपल्या संघाने ४५ षटकात १६३ धावा केल्या त्यांत प्रणव टिल्लू - ३५ धावा, ऋषिकेश देव - २३ धावा व सुयोग पाटील - २३ धावा केल्या तर अभिजित भागवत याने १६ धावांत ४ बळी घेतले.

भारतात तसेच परदेशातही मान्यता पावलेला राष्ट्रीय पारितोषिक विजेता मराठी चित्रपट 'श्यामची आई' यात श्यामची अजरामर भूमिका केलेले श्री. माधव वझे हे आपल्या शाळेत २९ नोव्हेंबर रोजी मुलांशी श्याम बाबत गुजगोष्टी करण्यास आवर्जुन उपस्थित होते.

त्याच कार्यक्रमात श्यामची आई या पुस्तकाचे चेतन दातार यांनी केलेले नाट्यरुपांतर सौ. माधवी जोग, सौ. अनुराधा जोग, सौ. कुंदा सामंत व सौ. वसुंधरा मेहेंदळे यांनी अतिशय प्रभावीरित्या सादर केले.

३० नोव्हे. रोजी श्री. विनायक कल्याणकर यांचे शिक्षकांसाठी 'शुद्धलेखनावर' व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२००५-०६ या शालेय वर्षात इ. ९ अ मधील चि. नचिकेत नंदकिशोर बुराडे याची आदर्श विद्यार्थी म्हणून निवड झाली.

बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे ३ सप्टें. ०५ रोजी डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक लेखी स्पर्धा घेण्यात आली.

**६ वी मधील**

१) गाडगीळ मिहीर मुकुंद
२) खामकर सायली प्रदीप
३) खेडेकर प्रफुल्ल पांडूरंग
४) कोठाळे मृण्मयी महेंद्र
५) साळेकर भाग्यश्री चंद्रकांत
६) यादव सचीन दिलीप
७) मोरे गौरी नामदेव

**९ वी मधील**

१) भोसले शिशिर राजाराम
२) बुराडे नचिकेत नंदकिशोर
३) पाटील तन्मय सुरेश
४) पाठारे सुप्रीम सुनिल
५) सनये विनायक विजय

या विद्यार्थ्यांची प्रयोग परीक्षेसाठी निवड करण्यात आली.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इंग्रजी प्रि. एलिमेंट्री व एलिमेंट्री परिक्षेचा निकाल जाहीर झाला. अनुक्रमे ८६% व ८७% टक्के निकाल लागला. त्यांत ६वी मधील अभिषेक नेने याला विशेष श्रेणी प्राप्त झाली.

I. P. M. तर्फे चि. अद्वैत संजय इनामदार याला रु. २००/- शिष्यवृत्ती गणित विषयासाठी जाहीर झाली. त्याचा ३२०० विद्यार्थ्यांतून ४८ वा क्रमांक आला.

दि. ३ डिसेंबर रोजी अे. के. जोशी इंग्रजी माध्यमातील शाळेत 'बाळू बाक्रे' संगीत स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यांत

१) गायन स्पर्धा - श्रद्धा यादव (८अ) प्रथम क्रमांक

२) तबला वादन - दुर्गेश पितळे (१० अ) प्रथम क्रमांक
प्रणव दांडेकर (९ अ) द्वितीय क्रमांक

३) हार्मोनियम - सुहास भोसले (१०अ) द्वितीय क्रमांक
यांना पारितोषिके मिळाली.

११ डिसेंबर व १२ डिसेंबर रोजी स्नेहसंम्मेलन अतिशय उत्साहात व शिस्तीत पार पडले. या कार्यक्रमांसाठी अनुक्रमे सौ. मधुरा बापट व श्री. सुरेंद्र वाजपेई हे आपल्याकडे प्रमुख पाहूणे आले होते.

स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात

इ. ५ वी - कन्हैया खेळ खेळू या नवा
(अ,ब,क,ड,ई)

इ. ६ वी - बाल्या नृत्य (अ,ब,क,ड,ई)

७ वी - वंदे मातरम् (अ,ब,क,ड,ई)

८वी - जीवन सुंदर आहे (८ ब)

९वी - भारुड (९ अ) वेड लागलं.

१० वी My मराठी fusion (१० अ)

या कार्यक्रमांची पारितोषिकासाठी निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे परिक्षक सौ. अंजली पटवर्धन, सौ. मनाली दिवेकर, सौ. मनिषा गोखले होत्या.

सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळा

१) कु. अपूर्वा उदय गायकवाड ८ वी ब हिला जळगांव येथे झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत पुढील बक्षीसे मिळाली -"

१. बटरफ्लाय - प्रथम
२. फ्री स्टाईल - द्वितीय
३. बॅक स्ट्रोक - द्वितीय
४. बेस्ट स्ट्रोक - द्वितीय

कै. केलास नगरकर यांच्या स्मरणार्थ असलेली चॅम्पियन ट्रॉफी ही तिला मिळाली.

२) जिज्ञासा ट्रस्ट ने आयोजित केलेल्या विज्ञान प्रकल्प स्पर्धेत - 'हायड्रोपोनिक्स' ह्या आमच्या शाळेने सादर केलेल्या विज्ञान प्रकल्पाला संपूर्ण महाराष्ट्रातील उत्कृष्ट प्रकल्प म्हणून गौरवले गेले आणि राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली. तसेच ३ जानेवारी पासून हैद्राबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान कॉंग्रेस मध्ये प्रकल्प सादर करण्याची संधी मिळाली आहे.

३) हरीद्वार येथे झालेल्या स्काऊटच्या राष्ट्रीय मेळाव्यात आमच्या शाळेतील १९ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले.

(i) जाम्बोरी १९ ते २२ ऑक्टोबर २००५.

(ii) देशाच्या विविध भागातील ३०००० विद्यार्थी जांबोरी साठी उपस्थित होते.

(iii) विविध स्पर्धांमधील महाराष्ट्राचा सहभाग उल्लेखनीय होता. महाराष्ट्राला २४ बक्षीसे मिळाली.

महाराष्ट्र राज्याला प्रथमच वीरबाला पथकाला राष्ट्रीय पातळीवर प्रथम व बालवीर पथकाला द्वितीय पारितोषिक मिळाले.

ठाणे जिल्ह्याच्या सहभागी विद्यार्थ्यांना 'कलर पार्टी' मध्ये प्रथम पारितोषिक

महाराष्ट्र राज्याच्या १३, १४, १५ ह्या कँम्पस ना स्वच्छतेचे प्रथम पारितोषिक.

साहस कॅम्प मधे ठाणे जिल्हाच्या कॅम्प नं. १५ ला असामान्य यश. 'मार्च पास्त' मधे आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड.

**I) स्त्री कल्याण संस्था वक्तृत्व स्पर्धा**

गट - ५/६ - कु. मिहिर कुलकर्णी - द्वितीय पारितोषिक

गट - ४ (८ वी) कु. सुरभि गोखले - प्रथम पारितोषिक

**II) अखिल भारतीय नाट्य परिषद नाट्य संगीत गायन स्पर्धा**

अखिल भारतीय नाट्य परिषद आयोजित कै. वि. रा. परांजपे नाट्य संगीत गायन स्पर्धेत इ. ९ वी तील विद्यार्थी कु. आदित्य कानविंदे यांस प्रथम पारितोषिक मिळाले. तसेच गडकरी रंगायतन येथे झालेल्या कै. राम मराठे संगीत महोत्सवातही त्याला गाण्याची संधी मिळाली.

## पॉलिस्पार्क

२ डिसेंबर २००५ चा तो दिवस. रंगीबेरंगी कपड्यांबरोबरच निसर्गाच्या थंडगार वातावरणात मन मोहून टाकणारा आणि आनंदाची जणू सीमारेषाच पार करणारा तो 'आनंद मेळा' आणि त्याचबरोबर आपले कौशल्य पणाला लावून त्या मुलांनी तयार केलेल्या त्या फोर व्हिलर्स 'पॉलिस्पार्क' आयोजित 'रोबोटिक्स कॉम्पिटिशन २००५', आज व्हि. पि. एम. एस. पॉलिटेक्नीकच्या कृत्रिम रस्त्यावर धावणार होत्या. अति प्रचंड वेगाने जाणाऱ्या या गाड्यांनी त्या दिवशी जणू विश्वविक्रमच केला होता.

त्या दिवशी प्रथम क्रमांक पटकाविलेल्या त्या गौरव जाधव याने ००.३९.८१ सेकंद अशी विक्रमी वेळेची



**'पॉलिस्पार्क' आयोजित रोबोटिक्स कॉम्पिटियन मधील प्रथम क्रमांकाची रोबोटिक्स**

नोंदी करुन रोबोटिक्सच्या तृतीय टप्पामधे आपले पक्के स्थान प्रस्थापित केले. तर रोहन मेनन याने ००.४१.५६ अशी अप्रतिम वेळ नोंदवून द्वितीय क्रमांक पटकाविला. त्याचबरोबर प्रणवने १८ सेकंदाची बरोबरी करत ००.५९.११ वेळ नोंदवून तृतीय क्रमांक पटकाविला. संकेत पाटिल, बुलिना मितभावकर यांसारख्या गट प्रमुखांनी आपापल्या कौशल्याने अप्रतिम गाड्या बनविल्या होत्या.

या खेळातील एक लक्षवेधी गोष्ट म्हणजे यात हिरिरिने भाग घेणारे विद्यार्थी हे विविध क्षेत्रातील होते. कोणी केमिकल ब्रँचचा तर कोणी कंप्युटर ब्रँचचा. मॅकॅनिक्स, इलेक्ट्रॉनिक्सशी तीळमात्र संबंध नसलेल्यांनीही त्यात सहभाग घेतला होता हे नवलच ! त्याला कारणच मुळात रॉबोटिक्स या खेळाचं वाढत प्राबल्य. हा खेळच आता सर्व तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांच्या मनात घर करु लागला आहे. हे प्राबल्य वाढविण्यासाठी सर्वात परिणामकारक ठरलेला घटक म्हणजेच २८ नोव्हेंबरचा तो 'टॉक शो' आणि त्या दिवशी दाखवलेली ती लहानशी प्रात्याक्षिके. तो ज्यांनी पाहिली, अनुभवली त्या प्रत्येकाने

त्यात आवर्जून भाग घेतला. मग त्याला कुठेही बंधने आड आली नाहित. कार्यक्रम यशस्वी ठरला; या यशाचे कारणच मुळी मुलांनी घेतलेली प्रचंड मेहनत, वापरलेली स्वबुद्धी, त्यांना लाभलेले थोरा-मोठ्यांचे मार्गदर्शन आणि त्यांच्या गाठिला असलेला अनुभवच होता.

भास्कर आजगांवकर
व्ही. पी. एम. एस. पॉलिटेक्निक
टी. वाय. आय. एफ

दरवर्षीप्रमाणे "पॉलिस्पार्क" हा विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचा सांस्कृतिक कार्यक्रम २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २००५ रोजी उत्साहात पार पडला. २८ नोव्हेंबर ला "ट्रॅडिशनल डे", रांगोळी स्पर्धा, मेंदी आणि टेकफेस्ट हे कार्यक्रम होते. त्यांत मोहिनी गव्हाळे (S.Y.IE) हिस प्रथम पारितोषिक मिळाले. रांगोळी स्पर्धेत स्नेहल शेंडे (T.Y.Co) हिला प्रथम पारितोषिक मिळाले. मेंदी स्पर्धेत निकिता भोसले (S.Y.Co) हिला प्रथम पारितोषिक मिळाले. टेकफेस्टमध्ये शोधा योधा निबंध सादर केले त्यात राहुल तळेकर (F.Y.J.C) प्रथम आला. २९ नोव्हेंबर रोजी मि. आणि मिस पॉलिस्पार्क हा रंगतदार कार्यक्रम झाला. यांत सिद्दीकी बाजुद्दीन (S.Y.J.C) हा मिस्टर पॉलिस्पार्क व प्रियांका बळसंगकर (T.Y.Co) ही



विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील "पॉलिस्पार्क" या कार्यक्रमाची एक झलक

मिस पॉलिस्पार्क म्हणून निवडले गेले. यांत परीक्षकांनी प्रश्न विचारुन या स्पर्धेत रंगत आणली. गाता रहे मेरा दिल या गाण्याच्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक कौस्तुभ कुलकर्णी (S.Y.ch) याने पटकावले.

Add-mad show मध्ये प्रशांत सिंग आणि इतर (T.Y.J.S) यांनी प्रथम पारितोषिक मिळाले. Instant Talent Hunt यांत प्रथम पारितोषिक कौस्तुभ कुलकर्णी (S.Y.ch) यास मिळाले. ३० नोव्हेंबर ला 'नच बलिये' या स्पर्धा झाल्या. यांत Solo Dance मध्ये रेखा जाधव (SYIf) हिला व ग्रुप डान्स मध्ये प्रथमेश आणि इतर (S.Y.IE) यांना प्रथम पारितोषिक मिळाले. १ डिसेंबर रोजी Laughter Challenge मध्ये प्रथम पारितोषिक हर्षल वाडे (S.Y.IE) यांस मिळाले. याच दिवशी सामाजिक जागृती साठी एडस् जागतिक दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ ठाणे सबर्बन यांचा एडस् जागृती दिन हा कार्यक्रम झाला. यावेळी श्री. माधव नानिवडेकर, सौ. कल्पिता मुळे, श्री. संजीव शेट्ये हे रोटरी क्लब तर्फे उपस्थित होते.

२ डिसेंबर रोजी आनंद मेळा सादर केला. यांत खाद्यपदार्थांमध्ये यशवंत राव आणि इतर (S.Y.ERS) यांना प्रथम क्रमांक आणि मनोरंजनार्थ असलेल्या खेळांमध्ये दीपक बोंडे आणि इतर (S.Y.J.S) यांना प्रथम क्रमांक मिळाला.

रंगतदार आणि सुरेख नियोजन असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. सी. आर. यू. पाटील (EPS विभाग) यांचे होते. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला. प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांनी ही विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन असाच कार्यक्रम दरवर्षी सुनियोजित करावा असे सांगितले.

आता विद्यार्थी या सांस्कृतिक कार्यक्रमातून अभ्यासाकडे वळले आहेत पुढील वर्षाच्या पॉलिस्पार्कच्या प्रतीक्षेत.

(मुखपृष्ठ क्र. १ वरून)

संपादकीय
## अनावश्यक माहितीचे ताण आणि मध्यमवर्गीय माणूस ?

या सर्वांपासून दूर जायची इच्छा ठेवली तरी शक्य नसतं. जग क्षणाक्षणाला इतकं बदलत चाललं आहे की 'टू कीप पेस विथ टाइम' याचं ओझं घेऊनच मध्यमवर्गीय शिक्षित शहरी माणूस जगत असतो आणि या तणावाचं व्यवस्थापन कसं करायचं ते कळत नाही.

''वाचाल तर वाचाल' यावर बोलताना, लिहिताना ग्रंथपाल म्हणून मी नेहमी 'काय वाचू नये ते ओळखता आलं पाहिजे असं आवर्जून सांगतो. कारण या प्रक्रियेचा डोळ्यावर ताण येतो तसाच मनावर ही येतो. माणसाने आपल्याकडे असणाऱ्या वेळेचं व्यवस्थापन करुन जीवन संघटित करण्याचा काळ आहे. जास्तीत जास्त ३६५०० (१०० वर्षे) दिवस आपल्याला आयुष्य मिळते. याचा अर्थ शहात्तर हजार तास ही आपली जीवन मर्यादा आहे. यात स्वत:ला, स्वत:च्या गरजांना ओळखून आपण जगणं आवश्यक आहे नाहीतर मानसिक स्वास्थ क्षणाक्षणाला संपत जाईल.

मानवी नाते संबंधांचे बदलते आयाम, स्वत:बद्दलच्या अवाजवी अपेक्षा, स्वत:बद्दलचे गंड या सर्वातून आपण ताणतणाव आपल्या आयुष्यात ओढवून आणतो. त्यापेक्षा स्वत:ला शोधावं, स्वत:ला ओळखावं **कारण अपेक्षा, अति हाव हे दु:खाचं मूळ असतं हे आपण समजावून घ्यायला हवं.**

हे झालं काय आहे त्याबद्दल यावर उपाय कोणते आहेत, यातून सुटायचं कसं याच्या उत्तराचा शोध आपण लगेच सुरु करतो. साडेतीन हात देहाला किती लागतं, काय लागतं व का लागतं याची उत्तरे व्यक्तिसापेक्ष आहेत त्यामुळे अमूक एक स्वामी, बाबा, महाराज, सद्‌गुरु यांची भाषणं पुस्तकं हा सुटण्याचा मार्ग ठरु शकतो असे नाही. अशा एका बाबांचे फक्त प्रवचनावरुन घरी येतायेता मित्राशी गप्पा मारताना त्यांना कळतं की 'उद्या पाणी येणार नाही.' (माहिती आपल्यापर्यंत येण्याचे मार्ग !) घरी येताच ते बायको, सून, मुलगा यांच्यावर डाफरतात, ''टी. व्ही. काय पहात बसलात, पाणी भरा पटापट.'' आता ही चिडचिड होणार असेल, मनावर माहितीचा ताण येणार असेल, तर प्रवचनांतून काय साधलं ? त्यामुळे आपल्या चित्तवृत्ती ताब्यात ठेवण्यासाठी आपणच साधना करायला हवी. 'गीता' हा ज्या संस्कृतीचा ग्रंथ आहे तो समजावून घेतला, त्यावर चिंतन केलं तर बरंच काही सापडतं. कारण या सर्व भस्मधारी भगव्या स्वामी महाराजांच्या ... व्यावसायिक पोपटपंचीची मूळ प्रेरणा गीता (**पण त्यांना न समजलेली!**) असते.

त्यामुळे ३६५०० दिवसांचं काय करायचं कोणते ताण घ्यायचे, किती घ्यायचे, घ्यायचे का ... आपणच आपलं ठरवायला हवं !

**आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.**